म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा० वा
दा क. ५०८९

IRBK-0107081
IRBK-0107081

५०१५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा ी भरावी लागेल.

DEC 1978

(कृ.मा.प.)

35

२०
वा. वा.
२१०२
3-?-61

# ….स्ताविक

या संग्रहांतील ‘ कागदी भिंती ’ ही नाटिका प्रथमतः पुणें आकाशवाणीवर प्रयोगित करण्यांत आली होती. तिचा पुस्तकांत समावेश करण्यास अनुमति दिल्याबद्दल आकाशवाणीचे मी आभार मानतों. मूळ नाटिकेंत कांहीं फेरबदल करून ती येथें सादर करीत आहें.

‘ नाटक बसतें आहे ’ या नाटिकेचे पहिले प्रयोग नाशिक येथील आकाशवाणीच्या साहित्यमेळाव्यांत आणि मुंबई येथें साहित्यसंघाच्या कोनशिला-समारंभांत झाले. नाशिकच्या प्रयोगांत श्री. ब. चिं. सहस्रबुद्धे यांनीं सादरकर्ते म्हणून आणि श्री. बाबूराव सावंत यांनीं सह-दिग्दर्शक म्हणून जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा व दोन्ही प्रयोगांत भूमिका करणाऱ्या सर्व कलावंतांचाहि मी आभारी आहें.

—वि. वा. शिरवाडकर

## सूचना

या संग्रहांतील कोणत्याहि नाटिकेचा कोणत्याहि स्वरूपाचा प्रयोग …त्यापूर्वी रु. १० प्रयोगशुल्क पाठवून आगाऊ अनुमति घ्यावी. …हकार प्रकाशन, शि… …काशकाकडे.

आर्ट डाय…
सहादू : (…
आर्ट डाय…

IRBK-0107081

[ नाटक बसतें आहे या एकांकिकेचा पहिला प्रयोग दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ रोजीं *आकाशवाणीच्या* पुणें केंद्रातर्फे नाशिक येथें झालेल्या साहित्यमेळाव्यांत सादर करण्यांत आला. ]

ह्या एकांकिकेंत पुढील कलावंतांनीं भाग घेतला :

| | | |
|---|---|---|
| आर्ट डायरेक्टर | : | श्री. बाबूराव दीक्षित |
| सहादू | : | श्री. वसंत पेठे |
| मॅनेजर | : | श्री. दत्ता नाडगौडा |
| डायरेक्टर | : | श्री. वसंत जहागिरदार |
| चमेलीबाई | : | सौ. सुधा हत्तंगडी |
| मालक | : | श्री. बाबूराव सावंत |
| नानाशेट | : | श्री. शंकरराव वाघ |
| लेखक | : | श्री. बाळ घोलप |

* * *

# नाटक बसतें आहे

[ थिएटरचें स्टेज. वेळ दुपारची. मागील बाजूला एक पडदा लावलेला असून कोपऱ्यांत इतस्ततः फ्रेटचे कांहीं तुकडे उभे करून एकावर एक ठेवलेले आहेत. दोन्ही बाजूंच्या विंगा लावलेल्या आहेत. स्टेजवर फ्रेटचा एक तुकडा आडवा पडलेला असून स्टुलें, रंगाचे डबे, सुतारी सामान इत्यादि साहित्य सर्वत्र विखुरलेलें आहे. एकूण नाटकाचा देखावा मांडायची तयारी चाललेली आहे. पडदा उघडतो, तेव्हां आर्ट डायरेक्टर शिडीवर उभा राहून डाव्या बाजूच्या विंगवर कांहीं काम करीत असतो. पडदा बाजूला होतांच तो रागारागानें इकडे तिकडे पाहतो नि ओरडतो. ]

**आर्ट डायरेक्टर :** अरे–अरे ! पडदा–पडदा–पडदा ! कोणत्या गाढवानं पडदा वरती खेंचला ? अरे, ही काय नाटक कंपनी आहे का चेष्टा आहे ? ( तारस्वरानें ) सहादू–सहादू–ए सहाद्या— !

**सहादू :** ( नाइलाजानें बाहेर येतो ) काय व ?

**आर्ट डायरेक्टर :** काय व ? लेका, पडदा कोणीं वरती ओढला ?

**सहादू :** ( विडी पेटवीत, संथपणानें ) म्याच वढला. दुसरं कोण येतंय पडदा वढायला ?

**आर्ट डायरेक्टर :** अरे, पण दीड शहाण्या—

**सहादू :** ( वर पाहत ) आं— !

**आर्ट डायरेक्टर :** तो काय तुझ्या बायकोचा बुरखा आहे, मनांत येईल तेव्हां बाजूला करायला ?

**सहादू :** ( स्टुलावर बसतो ) पन मला बायकूच नाय !

**आर्ट डायरेक्टर :** खड्ड्यांत गेली तुझी बायको !

**सहादू :** ( त्रासिकपणानें ) बायकूच नाय म्हंतो तरी—

**आर्ट डायरेक्टर :** ( खालीं उतरतो ) शिट्टी वाजवल्याशिवाय पडदा

[ नाटक बसतें आहे या एकांकिकेचा पहिला प्रयोग दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ रोजीं आकाशवाणीच्या पुणें केंद्रातर्फें नाशिक येथें झालेल्या साहित्यमेळाव्यांत सादर करण्यांत आला. ]

ह्या एकांकिकेंत पुढील कलावंतांनीं भाग घेतला :

| | | |
|---|---|---|
| आर्ट डायरेक्टर | : | श्री. बाबूराव दीक्षित |
| सहादू | : | श्री. वसंत पेठे |
| मॅनेजर | : | श्री. दत्ता नाडगौडा |
| डायरेक्टर | : | श्री. वसंत जहागिरदार |
| चमेलीबाई | : | सौ. सुधा हत्तंगडी |
| मालक | : | श्री. बाबूराव सावंत |
| नानाशेट | : | श्री. शंकरराव वाघ |
| लेखक | : | श्री. बाळ घोलप |

* * *

# नाटक बसतें आहे

[ थिएटरचें स्टेज. वेळ दुपारची. मागील बाजूला एक पडदा लावलेला असून कोपऱ्यांत इतस्ततः फ्रेंटचे कांहीं तुकडे उभे करून एकावर एक ठेवलेले आहेत. दोन्ही बाजूंच्या विंगा लावलेल्या आहेत. स्टेजवर फ्रेंटचा एक तुकडा आडवा पडलेला असून स्टुलें, रंगाचे डबे, सुतारी सामान इत्यादि साहित्य सर्वत्र विखुरलेलें आहे. एकूण नाटकाचा देखावा मांडायची तयारी चाललेली आहे. पडदा उघडतो, तेव्हां आर्ट डायरेक्टर शिडीवर उभा राहून डाव्या बाजूच्या विंगवर कांहीं काम करीत असतो. पडदा बाजूला होतांच तो रागारागानें इकडे तिकडे पाहतो नि ओरडतो. ]

**आर्ट डायरेक्टर :** अरे–अरे ! पडदा–पडदा–पडदा ! कोणत्या गाढवानं पडदा वरती खेंचला ? अरे, ही काय नाटक कंपनी आहे का चेष्टा आहे ? ( तारस्वरानें ) सहादू–सहादू–ए सहाद्या— !

**सहादू :** ( नाइलाजानें बाहेर येतो ) काय व ?

**आर्ट डायरेक्टर :** काय व ? लेका, पडदा कोणीं वरती ओढला ?

**सहादू :** ( विडी पेटवीत, संथपणानें ) म्याच वढला. दुसरं कोण येतंय् पडदा वढायला ?

**आर्ट डायरेक्टर :** अरे, पण दीड शहाण्या—

**सहादू :** ( वर पाहत ) आं— !

**आर्ट डायरेक्टर :** तो काय तुझ्या बायकोचा बुरखा आहे, मनांत येईल तेव्हां बाजूला करायला ?

**सहादू :** ( स्टुलावर बसतो ) पन मला बायकूच नाय !

**आर्ट डायरेक्टर :** खड्ड्यांत गेली तुझी बायको !

**सहादू :** ( त्रासिकपणानें ) बायकूच नाय म्हंतो तरी—

**आर्ट डायरेक्टर :** ( खालीं उतरतो ) शिट्टी वाजवल्याशिवाय पडदा

मीं !, मॅनेजर म्हणे ! खानावळींत पाट मांडायला आणि शेण लावायला होतास तूं— अजून हाताचा वास गेला नसेल !

**मॅनेजर :** अन् तूं काय ' राजा रविवर्मा ' होतास वाटतं ? अरे, चार चार आणे अक्षर करीत दुकानाच्या पाट्या रंगवणारा रंगारी तूं ! अन् त्यांतलाहि अनुभव म्हणाल तर स्वतःच्या दुकानाची पाटी रंगवली असशील तेवढीच. म्हणे आर्ट डायरेक्टर ! गाढवाला गंगेंत धुऊन काढलं म्हणून त्याचा कांहीं श्यामकर्ण होत नाहीं !

**सहादू :** ( नवी विडी पेटवीत ) पन् मी म्हनतों, तुम्हा लोकांना काय कामं न्हाईत ? वाइच्च बखेडे करतांय्. आतां डायरेक्टर येईल. मोठे साहेब बी यायचे हायेत.

( मॅनेजर पुन्हा चौपाईवर जाऊन बसतो. )

**आर्ट डायरेक्टर :** तूं आणखी शहाणपणा शिकवूं नकोस. जा— तो डोंगर घेऊन ये.

**सहादू :** डोंगर ? तो वला आहे अजून.

**आर्ट डायरेक्टर :** ओला आहे ? मग नदी घेऊन ये.

**सहादू :** नदी सुकलीय् चांगली. पण फाटली दोन जागीं.

**आर्ट डायरेक्टर :** नदी फाटली ? कशी ? कुणी फाडली ?

**सहादू :** डायरेक्टरसाहेबानं.

**आर्ट डायरेक्टर :** डायरेक्टरनं ? तो कशाला गेला नदींत मरायला ?

**सहादू :** आमी बसलों व्हतों नदी सुकवीत. तेवढ्यांत इकून आली चमेलीबाई अन् तिकून आला डायरेक्टर. चमेलीबाईला पाहिलं अन् एकदम धांवत सुटला तो तिच्याशीं बोलायला. धांवला तो नदीवरूनच. त्याच्या पायांत होते बूट अन् बुटाचे खिळे व्हते निघालेले. दोन जागीं घस लागला. ( हंसत ) चमेलीबाई लागली हंसायला—

**आर्ट डायरेक्टर :** अरे, मग कुठें आहे ती आतां ?

**सहादू :** चमेलीबाई ?

**आर्ट डायरेक्टर :** चमेलीबाई जाऊं दे चुलींत ! नदी कुठं आहे ?

**सहादू :** शिंप्याकडे शिवायला टाकलीय्.

**आर्ट डायरेक्टर** : ( वैतागानें ) डोंगर सुकला नाहीं, नदीला घस लागला. राम--राम-- आतां मालक काय म्हणतील ? आज सगळा सेट दाखवायचा होता त्यांना ! झोपडी तरी तयार आहे का ?

**सहादू** : अजून पट्ट्या मारायच्या हायेत.

**आर्ट डायरेक्टर** : अरे पण —

**सहादू** : आज मिस्त्री आला नाहीं. तो शिक पडलाय्.

**आर्ट डायरेक्टर** : छान ! फार छान ! ऐन शिकारीच्या वेळीं सारेजण बेपत्ता. एरव्हीं खंडोबाची यात्रा असल्यासारखे इथें गर्दी करतात – बरं तें रावणाचं सिंहासन घेऊन ये जा. त्याला वार्निश मारायचं आहे.

**सहादू** : हां – घेऊन येतों – ( थोडा जाऊन पुन्हा माघारीं येतो. ) शिम्मासन म्हंजे तें बसायचं व्हय् ?

**आर्ट डायरेक्टर** : हो, बसायचं. तें तरी आहे ना ?

**सहादू** : हां – तें हाय तसं – म्हंजे काल व्हतं.

**आर्ट डायरेक्टर** : काल होतं ? अन् आज कुठं गेलंय् ?

**सहादू** : तें हाय तसं तिकडं. पन् त्याचे दोन पावके तुटले हायेत, अन् पाठबी लपकली हाय्.

**आर्ट डायरेक्टर** : म्हणजे बसायची फळी तेवढी शिल्लक राहिली आहे ! तें सिंहासन तुझ्या पोरांना काय खेळायला दिलं होतंस ?

**सहादू** : म्यां सांगितलं ना, मला बायकू नाय म्हनून ! बायकू न्हाई अन् पोरंबी न्हाईत.

**मॅनेजर** : ( उठून ) मी सांगतों काय झालं तें. काल संध्याकाळीं आपले रामभाऊ भांगेची गोळी चढवून आले होते. त्या तारेमधें ते लागले मारुतीला शिव्या द्यायला. मारुतीच तो ! तो काय शिव्या ऐकून घेणार आहे ! त्यानं धरली रामाची मानगूट. झुंपली दोघांची – अगदीं फ्री स्टाईल ! दंगल करतां करतां दोघेंहि जाऊन आदळले ते रावणाच्या सिंहासनावर. पांगाऱ्याचं लाकूड तें – कचकलं चार ठिकाणीं !

**सहादू** : ( हंसत ) मारुतीनं लई बडवलं रामाला ! आय् – हाय् – हाय् – जल्माची सय राहील !

मीं ! मॅनेजर म्हणे ! खानावळींत पाट मांडायला आणि शेण लावायला होतास तूं— अजून हाताचा वास गेला नसेल !

**मॅनेजर :** अन् तूं काय ' राजा रविवर्मा ' होतास वाटतं ? अरे, चार चार आणे अक्षर करीत दुकानाच्या पाट्या रंगवणारा रंगारी तू ! अन् त्यांतलाहि अनुभव म्हणाल तर स्वतःच्या दुकानाची पाटी रंगवली असशील तेवढीच. म्हणे आर्ट डायरेक्टर ! गाढवाला गंगेंत धुऊन काढलं म्हणून त्याचा कांहीं श्यामकर्ण होत नाहीं !

**सहादू :** ( नवी विडी पेटवीत ), पन् मी म्हनतों, तुम्हा लोकांना काय कामं न्हाईत ? वाइच बखेडे करतांय्. आतां डायरेक्टर येईल. मोठे साहेब बी यायचे हायेत.

( मॅनेजर पुन्हा चौपाईवर जाऊन बसतो. )

**आर्ट डायरेक्टर :** तूं आणखी शहाणपणा शिकवूं नकोस. जा— तो डोंगर घेऊन ये.

**सहादू :** डोंगर ? तो वला आहे अजून.

**आर्ट डायरेक्टर :** ओला आहे ? मग नदी घेऊन ये.

**सहादू :** नदी सुकलीय् चांगली. पण फाटली दोन जागीं.

**आर्ट डायरेक्टर :** नदी फाटली ? कशी ? कुणी फाडली ?

**सहादू :** डायरेक्टरसाहेबानं.

**आर्ट डायरेक्टर :** डायरेक्टरनं ? तो कशाला गेला नदींत मरायला ?

**सहादू :** आमी बसलों व्हतों नदी सुकवीत. तेवढ्यांत इकून आली चमेलीबाई अन् तिकून आला डायरेक्टर. चमेलीबाईला पाहिलं अन् एकदम धांवत सुटला तो तिच्याशीं बोलायला. धांवला तो नदीवरूनच. त्याच्या पायांत होते बूट अन् बुटाचे खिळे व्हते निघालेले. दोन जागीं धस लागला. ( हंसत ) चमेलीबाई लागली हंसायला—

**आर्ट डायरेक्टर :** अरे, मग कुठें आहे ती आतां ?

**सहादू :** चमेलीबाई ?

**आर्ट डायरेक्टर :** चमेलीबाई जाऊं दे चुलींत ! नदी कुठं आहे ?

**सहादू :** शिंप्याकडे शिवायला टाकलीय्.

**आर्ट डायरेक्टर :** ( वैतागानें ) डोंगर सुकला नाहीं, नदीला घस लागला. राम–राम– आतां मालक काय म्हणतील ? आज सगळा सेट दाखवायचा होता त्यांना ! झोपडी तरी तयार आहे का ?

**सहादू :** अजून पट्ट्या मारायच्या हायेत.

**आर्ट डायरेक्टर :** अरे पण —

**सहादू :** आज मिस्त्री आला नाहीं. तो शिक पडलाय्.

**आर्ट डायरेक्टर :** छान ! फार छान ! ऐन शिकारीच्या वेळीं सारेजण बेपत्ता. एरव्हीं खंडोबाची यात्रा असल्यासारखे इथें गर्दी करतात — बरं तें रावणाचं सिंहासन घेऊन ये जा. त्याला वार्निश मारायचं आहे.

**सहादू :** हां – घेऊन येतों – ( थोडा जाऊन पुन्हा माघारीं येतो. ) शिम्मासन म्हंजे तें बसायचं व्हय् ?

**आर्ट डायरेक्टर :** हो, बसायचं. तें तरी आहे ना ?

**सहादू :** हां – तें हाय तसं – म्हंजे काल व्हतं.

**आर्ट डायरेक्टर :** काल होतं ? अन् आज कुठं गेलंय् ?

**सहादू :** तें हाय तसं तिकडं. पन् त्याचे दोन पावके तुटले हायेत्, अन् पाठबी लपकली हाय्.

**आर्ट डायरेक्टर :** म्हणजे बसायची फळी तेवढी शिल्लक राहिली आहे ! तें सिंहासन तुझ्या पोरांना काय खेळायला दिलं होतंस ?

**सहादू :** म्यां सांगितलं ना, मला बायकू नाय म्हनून ! बायकू न्हाई अन् पोरंबी न्हाईंत.

**मॅनेजर :** ( उठून ) मी सांगतों काय झालं तें. काल संध्याकाळीं आपले रामभाऊ भांगेची गोळी चढवून आले होते. त्या तारेमधें ते लागले मारुतीला शिव्या द्यायला. मारुतीच तो ! तो काय शिव्या ऐकून घेणार आहे ! त्यानं धरली रामाची मानगूट. झुंपली दोघांची – अगदीं फ्री स्टाईल ! दंगल करतां करतां दोघंहि जाऊन आदळले ते रावणाच्या सिंहासनावर. पांगाऱ्याचं लाकूड तें – कच्चकलं चार ठिकाणीं !

**सहादू :** ( हंसत ) मारुतीनं लई बडवलं रामाला ! आय् – हाय् – हाय् – जल्माची सय राहील !

**आर्ट डायरेक्टर** : उत्तम ! आणि हा सगळा तमाशा तुम्ही टाळ्या आणि शिट्या वाजवीत पहात बसलां ?

**मॅनेजर** : काय करणार मग ? आम्ही असे फाटक्या अंगाचे. त्या लाठमारींत शिरलों असतों तर त्या सिंहासनासारखीच आमची अवस्था झाली असती. पाय तुटलेले आणि पाठ लपकलेली !

**आर्ट डायरेक्टर** : डोंगर नाहीं, नदी नाहीं, झोपडी नाहीं, अन् सिंहासनहि नाहीं ! आतां मालकांना काय दाखवूं कपाळ ?

[ डोक्याला हात लावून स्टुलावर बसतो. ]

**मॅनेजर** : पेंटर, तुम्हीं चिंता करूं नका. तेवढं विंगेचं काम उरकून घ्या म्हणजे झालं. आज साहेब यायचे नाहींत अन् आले तरी फार वेळ थांबायचे नाहींत. संध्याकाळीं कापड–दुकानदारांची मीटिंग आहे. तिकडे जायचंय् त्यांना. शिवाय आज रावणहि यायचा नाहीं. रविवार असल्यानं तो रेसला गेला आहे. रामाची खात्री नाहीं. सुटीच्या दिवशीं त्याचा संगीत क्लास दुपारीं असतो.

**आर्ट डायरेक्टर** : ( उठतो ) कोणाचा संगीत क्लास, कोणाची मीटिंग, कोणाची रेस ! इतकं जंजाळ पाठीमागं आहे तर नाटकं करतात कशाला !

**मॅनेजर** : अरे यार, ही तर या धंद्यांतली मौज आहे. बाहेर सुखानं जगणारीं माणसं इथें डोकं आपटून मरायला येतात ! नशा आहे, नशा ! सहादू, हें सगळं आवरून ठेव, मी येतों आतां.

[ बाहेर जातो आर्ट डायरेक्टर रंगाचा डबा व ब्रश घेऊन विंगवर काम करूं लागतो. सहादू गाणें गुणगुणत इतस्ततः फिरतो. बाहेरून डायरेक्टरचा आवाज—]

**डायरेक्टर** : ( बाहेरून ) सहादू ! सहादू !

**सहादू** : ( झटपट कामाला लागत ) डायरेक्टर आलंय् वाटतं.

**डायरेक्टर** : ( प्रवेश करतो व कमरेवर हात ठेवून सर्वत्र पाहतो. ) अरे, अजून तुमचीं कामं चालू आहेत ? सेट तयार व्हायचा कधीं ?

**सहादू** : ( पुटपुटत ) हां— नदी फाडून ठेवलीय् चार जागीं—

**डायरेक्टर** : काय म्हणतोस सहादू ?

**सहादू** : काय नाय्— म्हटलं काम चाललंय्—

**डायरेक्टर** : कामं चाललंय ? अरे, कामांत कांहीं गति, कांहीं उत्साह, कांहीं लाइफ आहे कीं नाहीं ? वा ! जसा कांहीं दफन-पेट्यांचा कारखाना काढला आहे ! या चमेलीबाई ! [ चमेलीबाई आंत येते. ]

**चमेली** : कुणीं काढलाय् दफन-पेट्यांचा कारखाना ?

**डायरेक्टर** : या सहाद्यानं.

**चमेली** : होय रे ?

**सहादू** : व्हय् जी ! आपल्या खेळाच्या वेळीं थेटरांत इकायला ठेवायच्या आहेत.

( एक फ्लॅटचा तुकडा घेऊन मागें जातो आणि विडी ओढीत बसतो. )

**चमेली** : ए मेल्या ! बराच आहेस कीं ! पण डायरेक्टर, या नाटकाची मला फार भीति वाटायला लागली आहे बाई !

**डायरेक्टर** : कां ?

**चमेली** : काल तुम्ही प्रोफेसर दरवेशीच्या व्याख्यानाला नव्हतां आला कां ? ॲकॅडमीमध्यें ?

**डायरेक्टर** : ( सिगारेट शिलगावीत ) नाहीं. कशावर बोलला दरवेशी ?

**चमेली** : नाटकांतील सायकॉलॉजी. कित्ती कित्ती छान साहिती सांगितली त्यांनीं. अहो, ते म्हणाले कीं, आपल्या सगळ्यांना पदर असतात !

**डायरेक्टर** : ( गडबडून सिगारेट सावरीत ) प—प—पदर ?

**चमेली** : हो. म्हणजे आपण एक दिसतों ना–पण खरं म्हणजे तसे एक नसतों. आपल्यामध्यें वेगवेगळे पदर—म्हणजे धागे—एकत्र विणलेले असतात. दरवेशी म्हणाला कीं नटानं आपल्यामध्यें किती पदर आहेत याचा शोध घ्यावा. आणि ज्यांचे पदर असतील तेवढ्याच पात्रांच्या भूमिका कराव्यात. बाकीच्या भूमिका त्याला जमायच्याच नाहींत.— म्हणूनच या सीतेच्या कामाची मला फार धास्ती वाटायला लागली आहे.

[ स्टुलावरतीं सचिंत होऊन बसते. ]

**डायरेक्टर** : ( बुचकळ्यांत पडून ) पण कां ?

**चमेली** : माझ्या आतां लक्षांत आलं आहे कीं, सीतेचा धागा माझ्यामध्यें

**नानाशेट** : ( मोठ्यानें हंसून नमस्कार स्वीकारतो. )

**मालक** : ( खुर्चीवर बसतो ) बरं मॅनेजर, या आठवड्यापासून पेपरमध्यें पब्लिसिटी करायला हवी. तुम्हांला जाहिरातीचा मसुदा तयार करायला सांगितलं होतं. केला आहे का ?

**मॅनेजर** : ( पुढें येऊन ) हो–हो– साहेब. ( खिशांतून कांहीं कपटे काढतो. )

**मालक** : वाचा बरं. शेटजींनाहि ऐकायला मिळेल. आतां सारं कांहीं त्यांच्या पसंतीनं व्हायला हवं. काय शेटजी ?

**नानाशेट** : ( संतोषानें हंसतो. )

**मॅनेजर** : हं– ( वाचतो ) त्वरा करा—त्वरा करा—लौकर याल तर हंसाल, उशीर कराल तर फसाल—

पत्नीला हवी आहे नायलॉनची साडी...
मुलाला हवी आहे सॅटिनची चड्डी...
ऑफिससाठीं हवा आहे जॉर्जेटचा सूट...

**मालक** : जॉर्जेटचा सूट ? कधीं तुमच्या काकानं घातला होता का ? अहो, मी दुकानाच्या जाहिरातीचं म्हणत नाहीं. या नाटकाची जाहिरात हवी आहे मला. ती तयार आहे का ?

**मॅनेजर** : हो, तीहि लिहायला घेतली आहे. ( दुसरा कपटा काढतो व वाचतो ) हं–त्वरा करा–त्वरा करा–लौकर याल तर हंसाल–उशीर कराल तर फसाल—( पुन्हा हेंच वाचतों. )

**मालक** : पुढें ?

**मॅनेजर** : पुढचा मजकूर अजून लिहायचा आहे. कारण नाटकाचं नांव अद्याप नक्की झालेलं नाहीं.

**मालक** : डायरेक्टर, लेखकाला विचारलं का नांवाबद्दल ?

**डायरेक्टर** : हो. पण तो म्हणतो कीं, रामायणाचं कथानक आहे, तेव्हा ‘ कांचनमृग ’ हेंच नांव द्यायला हवं.

**मालक** : हें पहा, हे लेखक लोक आपल्या खोलींत कितीहि विद्वान् असले तरी बाहेरच्या व्यवहारांत निव्वळ शुंभ असतात ! आजच सकाळीं एक संपादक आमच्या दुकानांत आले होते. दहा रुपयांतून सहा रुपये

पस्तीस नवे पैसे गेले तर खालीं किती उरतात याचा हिशेब करायला त्याला पंधरा मिनिटं लागलीं. शेवटीं उत्तर काढलं तेहि चुकीचं. आणि हे गृहस्थ गेले चार दिवस दिल्ली सरकारच्या बजेटावर अग्रलेख लिहीत आहेत ! ( सारेजण हंसतात. ) तेव्हां लेखकाला काय हवंय् हा सवाल नाहीं. आज मार्केटांत कोणतीं नांवं चालतात हें पाहायला पाहिजे. काय शेटजी ?

**नानाशेट** : ( रुकार दर्शवीत हंसतो. )

**मालक** : कांचनमृग म्हणजे अगदींच जुनाट आणि आंखूड नांव वाटतं. सध्याच्या जमान्यांत नांव कसं लांबलचक हवं— नऊ वारीं पातळासारखं. चमेलीबाई, तुम्ही परवा कोणतं तरी नांव सुचवलं होतं—

**चमेली** : शेराला सव्वा शेर !

**मालक** : नाहीं, वेगळंच होतं.

**चमेली** : हं—शेळी जाते जिवानिशी—

**मालक** : नाहीं, हेंहि नाहीं. कांहीं तरी हिंदी आहे.

**चमेली** : हां आठवलं—घी देखा लेकिन बडगा नहीं देखा !

**मालक** : बरोबर हेंच ! रामायणाच्या कथानकाला हें नांव अगदीं फिट्ट बसतं ! घी देखा लेकिन बडगा नहीं देखा ! काय शेटजी ?

**नानाशेट** : ( अनुमतिदर्शक हास्य करतो. )

**डायरेक्टर** : ( चाचरत ) नाहीं— तसं हें नांव चांगलं आहे. पण मराठी नाटकाला हिंदी नांव म्हणजे जरा चमत्कारिक वाटतं. लेखकाला तें पटेल कीं नाहीं याची शंका आहे.

**मालक** : लेखक नाहीं म्हणाला तर लेखक बदला. पण नांव हेंच. ठीक आहे. या प्रश्नाची चर्चा नंतर करूं. डायरेक्टर, आज वेळ थोडा आहे. सगळी तालीम उद्यां पाहूं. एखादा चांगला बसलेला सीन घ्या आतां. म्हणजे शेटजींना साधारण कल्पना येईल.

**डायरेक्टर** : हो. चमेलीबाई, पंचवटींतला—रावण येतो तेव्हांचा प्रवेश घेऊं. चला— सहादू, हें स्टूल मागं ठेव—मॅनेजर, रावण कुठं आहे ?

**मॅनेजर** : त्याचा निरोप आहे, येतां यायचं नाहीं म्हणून. ( हलक्या स्वरांत ) आज रेस आहे ना !

**डायरेक्टर** : आणि राम ?

**मॅनेजर** : त्याला क्लास आहे संध्याकाळपर्यंत.

**डायरेक्टर** : आणि बाकीची मंडळी— मारुती, सुग्रीव, लक्ष्मण, दशरथ, कैकेयी ?

**मॅनेजर** : मी नोटीस पाठवली होती, पण कुणाचंच उत्तर नाहीं.

**मालक** : जाऊं द्या, डायरेक्टर. बॉक्स ऑफिसला राम नको आणि रावण नको, सीता हवी आहे. बाईंचा प्रवेश घ्या म्हणजे पुरे आहे. नाहीं का शेटजी ?

**नानाशेट** : ( गदगदून हंसतो. )

**डायरेक्टर** : ठीक आहे. चमेलीबाई, इथं उभ्या रहा. स्वगतापासून आरंभ करा. पेंटर, तुम्ही इकडे या. तुम्हीं कांचनमृग आहांत. इथें तुम्ही चरतां आहांत—

**आर्ट डायरेक्टर** : आँ ?

**डायरेक्टर** : चरतां आहांत म्हणजे फिरतां आहांत ! चार फूट पुढें आणि चार फूट मागें— ( स्वतः फिरून दाखवतो. )

**आर्ट डायरेक्टर** : ( निषेधाच्या स्वरांत ) पण— मी म्हणतों—

**डायरेक्टर** : कांहीं म्हणूं नका. स्टार्ट—!

[ आर्ट डायरेक्टर मागच्या बाजूला डाव्या कोपऱ्यांत फिरूं लागतो. ]

**डायरेक्टर** : सहादू !

**सहादू** : जी !

**डायरेक्टर** : तूं इथें ये. तूं राम आहेस.

**सहादू** : पन् मी म्हनतों –

**डायरेक्टर** : बोलायचं नाहीं. ही झोपडी आहे. समजलास ? हें झोपडीचं दार – हं – तूं इथं आंतमध्ये उभा आहेस. कांहींहि भाषण करायचं नाहीं. नुसती कृति करायची. आलं लक्षांत ?

**सहादू** : नाय् जी. कुरती म्हजे ?

**डायरेक्टर** : कृति म्हणजे ॲक्शन – ॲक्टिंग –

**सहादू** : हां. असं मराठींत सांगा ना. मी बराबर आक्शान करतों. पन् बाईसाहेबांना इचारा ना – मी राम झालों तर चालल का ?

**डायरेक्टर** : ( ओरडतो ) बोलायचं नाहीं. उभा राहा तिथं – झोपडीच्या आंत. ( सहादू काल्पानक दारांतून वाकून जातो व उभा राहतो. )

**डायरेक्टर** : (चमेलीकडे येतो.) हं, बाई, स्टार्ट ! एक—दोन—तीन—!

[ तीन ह्या आंकड्याला आवेशानें टाळी वाजवतो. ]

**चमेली** : ( मिटलेले डोळे उघडून ) तुम्हांला हज्जारदां सांगितलं कीं, असं आंकडे मोजून माझ्यापुढें टाळ्या वाजवीत जाऊं नका म्हणून ! मी नाटकांत काम करतें आहें. सर्कशींत नाहीं. आधींच माझ्यांत सीतेचा धागा नाहीं. थोडासा मूड आला होता, तोहि तुमच्या टाळीनं गेला. आतां बसा !

[ स्टुलावर बसते. ]

**डायरेक्टर** : ( रागानें ) हें पहा चमेलीबाई, एका टाळीनं जर तुमचा मूड जाणार असेल तर — तर —

**चमेली** : ( धमकावणीच्या स्वरांत ) तर ? काय ?

**डायरेक्टर** : ( माघार घेऊन ) तर — मी टाळी वाजवणार नाहीं. तुम्हांला आश्वासन देतों. हं, करा सुरुवात—

[ चमेली उठून पुढें येते. ]

**नानाशेट** : ( मोठ्यानें हंसतो व एकदम हंसणें आवरतो. )

**चमेली** : ( अस्वस्थ होऊन ) अॅस्प्रोची गोळी आहे का ?

**डायरेक्टर** : नाहीं. मला आधीं सांगितलं असतंत तर—

**चमेली** : ठीक आहे. ( सहादू अभावितपणें पुढें येतो ) सहादू, झोंपडीच्या बाहेर कशाला आलास ? आधीं आंतमध्यें हो !

**सहादू** : व्हय् जी. जातों झोपडींत. पन् मला सहादू म्हनूं नका. माझाबी मूड जाईल. नाथ म्हना, महाराज म्हना, रामराया म्हना—

**डायरेक्टर** : ( ओरडतो ) सायलेन्स ! हं — स्टार्ट !

[ चमेली क्षणभर डोळे मिटते. आर्ट डायरेक्टर पुन्हां कांचन-मृगासारखा मागच्या बाजूला फेऱ्या मारतो. सहादू आपल्या जागेवर गंभीरपणें उभा राहतो. डायरेक्टर नाटकाची वही उघडून प्रॉम्टिंगची तयारी करतो. मॅनेजर मालकाला सिगारेटची पेटी देतो व बाजूला होतो. नानाशेट बारकाईनें पाहूं लागतो. ]

**चमेली** : ( अभिनय करीत—) आज माझ्या मनावर ही अकारण उदासीन-तेची गाढ सावली कां बरं पडली आहे ? कैकेयी सासूबाईनीं वनवासाची आज्ञा केली तेव्हां देखील माझं मन डगमगलं नाहीं. अयोध्येच्या

राजवाड्यांतून आम्ही बाहेर पडलों तेव्हांसुद्धां माझ्या अंतःकरणाला दुःखाचा स्पर्श झाला नाहीं. गुहाच्या नौकेंत बसून आम्ही गंगा नदी पार करीत असतां मध्यें नौका थोडीशी कलंडली; पण तेव्हांसुद्धां माझ्या हृदयाला भीति वाटली नाहीं. मग, आजच्च हें असं कां बरं व्हावं? हे जांभळ्या मेघांनो, हे हिरव्या वृक्षांनो, हे काळ्या कातळांनो, हे तांबड्या — तांबडे कोण आहेत हो?

**डायरेक्टर :** तांबडे कुणी नाहींत! हे निळ्या नद्यांनो—

**चमेली :** हे निळ्या मेघांनो—

**डायरेक्टर :** ( दुरुस्ती करीत ) जांभळ्या मेघांनो—

**चमेली :** ( अस्वस्थ होऊन ) हे जांभळ्या मेघांनो, हे तांबड्या नद्यांनो, हे पांढऱ्या कातळांनो — आपलं — काळ्या पातळांनो — नाहीं हो, नाहीं जमत मला!

[ कपाळाला हात लावून हताशपणें उभी राहते. सर्वत्र क्षणभर स्तब्धता. ]

**नानाशेट :** ( अकस्मात् दाबलेल्या हास्याचा स्फोट होतो. )

**मालक :** अरे, हा काय लेखक आहे का रंगारी आहे? दोन ओळींत दहा रंग शिंपडले आहेत त्यानं. कसं राहणार माणसाच्या लक्षांत? काढून टाका तें सारं — हं पुढें —

**डायरेक्टर :** ( नाइलाजानें ) ठीक. पुढच्या पीसपासून घ्या. खरं म्हणजे—

**चमेली :** ( निर्धारानें तयार होऊन ) — खरं म्हणजे इथें कोणत्या सुखाची कमतरता आहे? पृथ्वीवरील साक्षात् नंदनवन अशी ही जनस्थानची भूमि. शीतल वारे वहात आहेत; गोदेचा स्फटिकासारखा प्रवाह पर्णकुटीच्या परिसरांत झुळझुळतो आहे; निरभ्र आकाशांत क्रौंच पक्षी संचार करीत आहेत —

**मालक :** कोणते पक्षी?

**चमेली :** ( ओरडून ) क्रौंच — क्रौंच पक्षी.

**मालक :** क्रौंच? हजार पक्षी पाहिले असतील आजवर! पण या पक्ष्याचं नांवदेखील कधीं ऐकलं नाहीं. शेटजी, तुम्ही पाहिला आहे का क्रौंच?

**नानाशेट :** ( मान हालवीत हंसतो. )

**मालक :** डायरेक्टर, तुम्हांला ठाऊक आहे?

**डायरेक्टर** : नाहीं. म्हणजे एक प्रकारचा हा– ( हातवारे करतो. )
**मालक** : पक्षी ? मग काय जनावरं आकाशांत उडत असतात वाटतं ? जें आपल्याला कळत नाहीं तें लोकांना सांगण्यांत काय हंशील आहे ! तो क्रौंच–काट मारा– ! पुढें—
**डायरेक्टर** : ठीक. हं स्टार्ट– ! माझे प्राणप्रिय—
**चमेली** : ( साभिनय ) माझे प्राणप्रिय नाथ, सातां जन्मांचे स्वामी, माझ्या पृथ्वीवरचे परमेश्वर, श्रीरामचंद्र माझ्या शेजारीं सतत उभे आहेत, आदर्श बंधुप्रेमाची साक्षात् मूर्ति असलेले लक्ष्मण-भावोजी रोज सकाळीं उठून बाजारांत जातात—
**डायरेक्टर** : ( वैतागून ) जंगलांत ! बाजारांत नाहीं.
**चमेली** : मटन काय जंगलांत मिळतं वाटतं ?
**डायरेक्टर** : अहो, मटनाचा इथं काय संबंध ? ( वाचतो ) लक्ष्मण-भावोजी रोज जंगलांत जातात, भोजनासाठीं मृगाचं रुचकर मांस आणि ताजीं कंदमुळं घेऊन येतात—
**चमेली** : लक्ष्मण-भावोजी रोज—
**मालक** : डायरेक्टर, तुम्हीं नाटक एडिट केलेलं दिसत नाहीं. सीता काय मांस खात होती ? छान ! राम दारू पीत होता आणि लक्ष्मण आंकडे लावीत होता– असंहि म्हणाल उद्यां !
**डायरेक्टर** : ( अगतिकपणानें तिकडे पाहून ) हा नाटककार कुठें गेलाय् कुणास ठाऊक ? ( मोठ्यानें ) अहो, लेखक !
**मालक** : काट मारा—
**डायरेक्टर** : पण तो म्हणत होता कीं, मूळ वाल्मीकि रामायणांत असा उल्लेख आहे म्हणून.
**मालक** : लोक माझं नाटक पाहायला येतात, वाल्मीकीचं रामायण वाचायला येत नाहींत ! काय शेटजी ?
**नानाशेट** : ( मान डोलवून मोठ्यानें हंसतो. )
**डायरेक्टर** : ठीक आहे. चमेलीबाई, नुसतं कंदमुळं म्हणा. हं–स्टार्ट ! एक–दोन–तीन !—( तीन म्हणून पुन्हा टाळी वाजवितो ) माफ करा हं. लक्ष्मण-भावोजी—

**चमेली :** लक्ष्मण-भावोजी रोज जंगलांत जातात आणि भोजनासाठीं मृगाचं रुचकर मांस—इश्श ! माझ्या तोंडांत बसलं आहे तें.

**नानाशेट :** ( स्फोट झाल्याप्रमाणें हंसतो. )

**मालक :** बरं. तेवढं लक्षांत ठेवा म्हणजे झालं. पुढं.

**चमेली :** ( अत्यंत नाटकीपणानें ) आणि कंदमुळं घेऊन येतात. जीवनांतलीं सारीं सुखं माझ्या हांकेची वाट पाहत सभोंवार उभीं आहेत. पण माझ्या अंतःकरणाला ही अशी हुरहूर कां वाटावी बरं ? कांहीं कळत नाहीं—

**डायरेक्टर :** हें पहा चमेलीबाई, फार कृत्रिम होतं हें. आपल्याला नॅचरल टोनिंग हवं आहे. अगदी घरगुती, नेहमीच्या स्वरांत म्हणा.

**चमेली :** ( फारच घरगुती स्वरांत— ) जीवनांतलीं सारीं सुखं माझ्या हांकेची वाट पाहत सभोंवार उभीं आहेत. मग माझ्या अंतःकरणाला ही अशी हुरहूर कां बरं वाटावी ? कांहीं कळत नाहीं—

**मालक :** ( रागानें ) डायरेक्टर, खड्ड्यांत गेलं तें नॅचरल टोनिंग ! ही सीता आहे का तुमच्या घरांतील स्वयंपाकीण आहे ? घरगुती टोनिंग ऐकायला लोक थेटरांत कशाला येतील ? घरीं पुष्कळ ऐकायला मिळतं तें—हं पुढें—

**चमेली :** ( पूर्ववत् ) मग माझ्या अंतःकरणाला अशी हुरहूर कां वाटावी बरं ? कांहीं कळत नाहीं. माणसाचं मन मोठं विचित्र आहे. तें सुखांत सुखावत नाहीं, दुःखांत दुखावत नाहीं—

**मालक :** काय ?

**चमेली :** ( मोठ्यानें ओरडते ) दुःखांत दुखावत नाहीं !

**मालक :** म्हणजे काय ?

**चमेली :** इश्श ! मला काय माहीत ?

**डायरेक्टर :** ( समजावण्याचा वृथा प्रयत्न करीत ) म्हणजे असं कीं, आपल्याला जें दुःख असतं—म्हणजे समजा कीं,—कांहीं नुकसान झालं किंवा चोरी झाली—किंवा कोणी माणूस दगावलं किंवा—

[ पेंटर, मॅनेजर व सहादू हलके हलके पुढें येऊन त्याच्याकडे बारकाईनें पाहात त्याच्याभोंवतीं उभे राहतात. ]

**मालक :** बरं. पुढें ?

**डायरेक्टर :** असं झालं म्हणजे—आपल्याला—जें—जें हें होतं, तें—खरं म्हणजे—(शेवटीं नाद सोडतो व चिडून ओरडतो) अरे, हा लेखक कुठें बेपत्ता झाला? माझ्याबरोबर इथपर्यंत आला होता—

[ तिघेजण माघारीं जाऊन उभे राहतात. ]

**मालक :** छान! नटाला समजत नाहीं आपण काय बोलतो तें; डायरेक्टरला समजत नाहीं आपण काय शिकवतों तें, आणि बहुधा लेखकालाहि समजत नाहीं आपण काय लिहितों तें! आणि हें सारं पिटांतल्या प्रेक्षकांना कळायला हवं अशी तुमची अपेक्षा! कांट मारा— पुढें—

**चमेली :** (साभिनय) पण—हें काय? ही कसली सळसळ ऐकूं येते आहे? (थांबलेला आर्ट डायरेक्टर पुन्हा मृगासारखा फिरूं लागतो.) अगबाई, त्या पलाश वृक्षाखालीं तें काय बरं दिसतं आहे? हा कांचनमृग तर नव्हे? स्वर्गांतून उतरलेल्या एखाद्या सुंदर स्वप्नासारखा तो चार फूट पुढं आणि चार फूट मागं असा संचार करीत आहे—

[ डायरेक्टरहि तिच्याबरोबर अभिनय करतो. ]

**डायरेक्टर :** (एकदम भानावर येऊन) अहो, हें काय— हें काय— हें चार फूट कुठून आणले?

**चमेली :** माफ करा हं. तुम्ही मघाशीं बोललांत तेंच डोक्यांत बसलं. हं— (अभिनय करीत) सुंदर स्वप्नासारखा तो संचार करीत आहे. (मागें वळून) नाथ! नाथ! आधीं बाहेर या—

**सहादू :** (पुढें येऊन साभिनय) काय म्हणतां व शीताबाय्?

**नानाशेट :** (सात मजली हास्य करतो)

**डायरेक्टर :** (सहादूच्या अंगावर धावून) ए गाढवा! तूं भाषण करूं नकोस! उभा राहा जागेवर जाऊन.

**सहादू :** राहलं. आपलं काय?

[ पुन्हा मागें जाऊन उभा राहतो. ]

**डायरेक्टर :** (वहींतून वाचतो) हं, काय म्हणतेस प्रिये?

**चमेली :** अहो, तो कांचनमृग पाहिलांत का? किती सुंदर आहे! गडे, याच्या कातडीचा झंपर केला तर किती छान दिसेल नाहीं!



म. म. स. ठाणे, ग्रंथालय
वा. क्र. ..

**डायरेक्टर** : ( ओरडतो ) झंपर नाहीं, काचोळी !

**चमेली** : काचोळी म्हणजे काय ?

**डायरेक्टर** : झंपरच एक प्रकारचा !

**चमेली** : मग झंपर म्हटलं तर काय बिघडलं ?

**डायरेक्टर** : अहो, पण तो इंग्रजी शब्द आहे ?

**चमेली** : अन् काचोळी ?

**डायरेक्टर** : तो मराठी आहे !

**चमेली** : कांहीं तरीच तुमचं ! आमचे शिंपी आणि धोबीदेखील झंपरच म्हणतात. ते काय विलायतेला गेले होते वाटतं ?

**डायरेक्टर** : ( डोक्याला हात लावून ) अहो—पण—पण—

**मालक** : ( खिशांतला रुमाल काढतो ) डायरेक्टर, झंपर–काचोळीवर काय अडून बसलांत ? जाऊं द्या ना ! त्यांना झंपर आवडत असेल, तर झंपर म्हणूं द्या. नाहीं तर तुमचं राहूं द्या, त्यांचं राहूं द्या. ब्लाऊज म्हणा. पोलकं म्हणा, चोळी म्हटलं तरी देखील चालेल. इंग्रजी असो नाहीं तर मराठी असो ! लोकांना काय जास्ती समजतं हें पाहायला हवं.

**डायरेक्टर** : ( असहाय्यपणानें ) अहो—पण—पण—सीता इंग्रजी शब्द वापरील कशी ?

**मालक** : ( बोटाभोंवतीं रुमाल गुंडाळीत ) नाहीं तरी सीता काय मराठीमध्ये भाषण करीत होती वाटतं ? तसं पाहिलं तर सगळं नाटक संस्कृतमध्येच हवं. काय शेटजी ?

**नानाशेट** : ( मोठ्यानें हंसून मान डोलावतो. )

**चमेली** : ( डायरेक्टरला उद्देशून हलक्या स्वरांत ) तें पाहिलंत का, त्यांनीं रुमाल बोटाला गुंडाळला. आतां फरकन् ओढतील ते. तो पहा ओढला. हा दुःशासनाचा धागा.

**डायरेक्टर** : ( भडकून ) जहन्नममध्यें गेला तो दुःशासन आणि त्याचा धागा !

**मालक** : ( आश्चर्यानें ) दुःशासन ? अरे, राम-रावणाच्या नाटकांत हा दुःशासन कुठून आला ? ( उठून समजावणीच्या स्वरांत ) हें पहा

डायरेक्टर, डोकं जरा काबूंत ठेवा. असं बेभान होऊं नका. पाहिजे तर, आणखी वेळ घ्या. आपलं कांहीं ॲमॅच्युअर लोकांचं नाटक नाहीं. घशांत अडकलेला हाडाचा तुकडा मांजर खोकून खांकरून एकदाचा बाहेर काढतें, त्याप्रमाणं कसाबसा एखादा प्रयोग झाला कीं सुटले. आपलं तसं नाहीं. धंदा करायचा आहे आपल्याला. पहिले सात प्रयोग तर हे शेटजीच घेणार आहेत—

**नानाशेट** : ( मोठ्यानें हंसून, मान नकारार्थी हालवतो. )

[ सारेजण स्तब्ध होऊन त्याच्याकडे पाहतात. ]

**मालक** : ( घोगऱ्या स्वरांत ) काय, सात प्रयोग घेणार नाहीं तुम्ही ?

**नानाशेट** : ( पूर्ववत् हसून मान हालवतो. )

**मालक** : मग किती घेणार ?

**नानाशेट** : ( अनावरपणें हंसत एक बोट वरतीं करतो. )

**मालक** : एकच ?

**नानाशेट** : ( हंसतां हंसतां होकार दर्शवितो. )

**मालक** : ठीक आहे. ( खुर्चीवर बसून ) आतांच त्याची चर्चा नको. हं, चमेलीबाई, करा सुरुवात पुन्हां.

**चमेली** : ( साभिनय ) अहो, तो कांचनमृग पाहिलांत का ? किती सुंदर आहे. गडे, याच्या कांतडीचा ब्लाऊज केला तर— ?

**डायरेक्टर** : ( संयम सुटून तारस्वरांत ओरडतो ) काचोळी...काचोळी... काचोळी ! मी प्राण गेला तरी ब्लाऊज किंवा झंपर म्हणूं देणार नाहीं !

**चमेली** : ( त्याच्याप्रमाणेंच संतापानें ओरडते ) मग मीहि प्राण गेला तरी काचोळी म्हणणार नाहीं ! असे छप्पन्न डायरेक्टर पाहिले आहेत !

**डायरेक्टर** : ठाऊक आहे मला ! पण हा सत्तावन्नावा फार वेगळा आहे हे ध्यानांत ठेव. तुझे चोचले मी इथें चालूं देणार नाहीं !

[ आरडाओरड करीत दोघेजण एकमेकांवर धावतात. ]

**सहादू** : अवो, हा बखेडा कशापायीं ?

**मॅनेजर** : डायरेक्टर—जरा शांत व्हा—

**मालक** : चमेलीबाई—तुम्हीं—जरा—

[ सर्वजण आपापल्या जागेवरून पुढें येतात व त्यांना आवरायचा प्रयत्न करतात. हा गोंधळ चालू असतांच ऑडिटोरियममधून एक व्यक्ति उठते आणि ओरडते— ]

**व्यक्ति :** खामोश ! खामोश ! हें काय नाटक आहे कीं तमाशा आहे ?

[ सारेजण एकदम स्तब्ध होऊन समोर पाहतात. ती व्यक्ति पुढें येऊन स्टेजवर चढते. ]

**डायरेक्टर :** कोण लेखक ? छान ! मी मघांपासून तुमच्या नांवानं शंख करतों आहें आणि तुम्हीं आपले थेटरामध्यें बसून राहिलांत.

**लेखक :** ( शांत पण कणखर स्वरांत ) हो, राहिलों बसून. ती नाटकाची वही द्या इकडे.

**डायरेक्टर :** क...क...काय ?

**लेखक :** ( जोरानें ) ती वही द्या ।

**डायरेक्टर :** ( वही देतो ) पण—पण—

**लेखक :** तुमच्यासारख्यांच्या हातीं हें नाटक देण्यापेक्षां तें बंबांत घालून जाळून टाकलेलं बरं ! अच्छा ! नमस्कार ! नमस्कार मंडळी !

[ बाहेर निघून जातो. सगळेजण भांबावून त्याच्या मागोमाग जातात व विंगपाशीं उभे राहतात. नानाशेटच्या दाबलेल्या हास्याचा पुन्हां एकदां जोरदार स्फोट होतो. ]

—: प ड दा :—

: २ :

# कागदाच्या भिंती

[ श्री. अप्पासाहेब जोशी–नाटककार–यांच्या घरांतील बैठकीची खोली. दोन्ही बाजूंस दोन दारें असून समोरच्या बाजूस दोन खिडक्या आहेत. उजव्या कोपऱ्यांत एक छोटें टेबल असून त्यावरतीं मेजदिवा जळत आहे. खोलींत मध्यभागीं तीन-चार खुर्च्या, एक आरामखुर्ची, बाजूला पुस्तकांचीं शेल्फ्स् इत्यादि. छताला एक दिवा टांगलेला. पडदा वरतीं जातो तेव्हां अप्पासाहेब टेबलाजवळ बसून कागदांची आवराआवर करीत असतात. तेवढ्यांत दोन खिडक्यांमध्यें असलेला टेलिफोन खणखणूं लागतो. अप्पासाहेब उठतात आणि रिसीव्हर उचलून बोलूं लागतात— ]

**अप्पासाहेब** : हॅलो–होय, मी जोशी बोलतों आहें. कोण ? शारदाबाई ?— हो हो-आलं ध्यानांत. महिला सभेच्या चिटणीस ना ?— नाटक ?— होय, झालं एकदाचं पुरं–नाहीं, तसं नाहीं–मनासारखंच झालं आहे. पण विषय जरा कठीण असल्यामुळं त्रास खूप झाला !—हो तर–सगळ्या गोष्टी बरोबर सांभाळाव्या लागतात.—असं कांहीं पुरोगामी, क्रांतिकारक लिहायचं म्हणजे सूर्याप्रमाणं अठरा घोड्यांचा रथ चालवण्यासारखंच आहे !—( हंसतो ) छे छे, मी कुठला साहित्यसूर्य ! आपली एक पणती मिणमिणते आहे झालं. हस्तलिखित ना ?—तुमचे ते दिग्दर्शक संध्याकाळीं आले होते, त्यांच्या हवालीं केलं.–होय, ते घेऊन गेले–पदं ? आतां इतका वेळ तींच लिहीत बसलों होतों–हो–तींहि तयार आहेत-नाटकाचं नांव ? अद्याप निश्चित केलं नाहीं. तूर्त संगीत अस्पृश्योद्धार असं ठेवलं आहे.— हो–सुचलं तर बदलूं–त्याची चिंता नको. गांधीसप्ताहाला योग्य असाच विषय आहे. मंत्री यायचे आहेत—हो, त्यांना आवडेल तें. त्यांचंच कार्य आम्ही करतों आहोंत.—उद्यांच नारळ फोडणार ?—ठीक-हो, अवश्य येईन.—पदं सकाळीं पाठवून देतों–अच्छा !–नमस्कार !

[ फोन खालीं ठेवून परत टेबलाजवळ जातात, आवराआवर पूर्ण करून मेजदिवा मालवतात आणि समाधानाच्या भावनेनें अलीकडे येऊन वेड्यावांकड्या परंतु उत्साही स्वरांत कविता गाऊं लागतात. ]

**अप्पासाहेब** : ( इतस्ततः संचार करीत )

हें कोण बोललें बोला—
राजहंस माझा निजला।
करुं नका गलबला अगदीं—
लागली झोप मम बाळा।
राजहंस माझा ऽऽऽ निजला ऽऽऽ

[ आंतील दारांतून लीलाबाई—अप्पासाहेबांची पत्नी—दुधाचा कप घेऊन प्रवेश करते. ]

**लीलाबाई** : मध्यरात्र व्हायला आली आणि तुमचा राजहंस आतां जागा झाला. रात्रीच्या वेळीं असं वेडवांकडं गाणं बरं का ?

**अप्पासाहेब** : वेडंवांकडं ? अग, राम गणेश गडकऱ्यांची एक अजरामर कविता आहे ही !

**लीलाबाई** : गडकऱ्यांच्या कवितेचं म्हणत नाहीं मी. तुमच्या आवाजाचं म्हणतें आहें—घ्या हें दूध—लहानपणीं कोठलीं तरी वासुदेव—भुत्याचीं गाणीं ऐकलीं, त्या एका चालींत तुमचं सगळं संगीत चालू असतं. जशी कांहीं पिठाची गिरणी. कोणतंहि गाणं भुगा होऊन बाहेर पडत !

**अप्पासाहेब** : ( दूध घेतां घेतां, बायकोकडे कौतुकानें पाहत ) वेडेंवांकुडें गाईन, परी आपुलेंचि म्हणवीन. तुकारामबुवांनीं सांगून ठेवलं आहे.

**लीलाबाई** : सांगू द्या—साधुसंतांचीं वचनं साधुसंतांसाठीं असतात आटोपा, दूध घेऊन टाका आणि मच्छरदाणी लावून द्या. मला झोप यायला लागली आहे.

**अप्पासाहेब** : मच्छरदाणी ! काय भाषेची मौज असते पाहा. फुलदाणी-मध्यें फुलें असतात, अत्तरदाणीमध्यें अत्तर असतें, पण मच्छरदाणी-

मध्यें मात्र माणसं असतात. मच्छरांना आंत येण्याची सक्त मनाई ! खरं म्हणजे—

**लीलाबाई :** आतां पुरे करणार आहांत का हें प्रवचन ? रात्र झाली कीं तुमचा दिवस उजाडतो. अन् हें पुढचें दार तसंच उघडं टाकलं ! इकडे लिहीत असतां एखादा चोर पाठीशीं येऊन उभा राहील तरी कळायचं नाहीं.

[ दार लावून घेते. ]

**लीलाबाई :** ( माघारीं येत असतां ) हो, आत्तां फोन कुणाचा आला होता ?

**अप्पासाहेब :** ( कप बाजूला ठेवून ) फोन ?—हो, महिलामंडळाचा आला होता !

**लीलाबाई :** महिलामंडळाचा ? मंडळाला फोन करतां येतो वाटतं ?

**अप्पासाहेब :** मंडळाचा म्हणजे मंडळाच्या चिटणीसबाईंचा !

**लीलाबाई :** म्हणजे शारदाबाईंचा ?

**अप्पासाहेब :** होय, त्यांचाच.

**लीलाबाई :** साऱ्या मुलखाची उनाड मैना ती. तिला कशाला या भलत्या वेळीं फोन केला ?

**अप्पासाहेब :** मीं केला नाहीं, तिनं केला. आणि फोन भलत्या वेळीं केला असला तरी तिच्या उनाडपणाचा त्याच्याशीं कांहींही संबंध नाहीं. महिलामंडळाच्या गांधीसप्ताहांतील कार्यक्रमासाठीं मीं एक नाटक लिहिलं आहे. त्या नाटकासंबंधीं चौकशी करीत होती ती बिचारी.

**लीलाबाई :** ( आवराआवर करीत ) गेले आठ दिवस मानेवर खडा ठेवून हेंच लिहिणं चाललं होतं वाटतं ? मी सांगितलं तर बाजाराच्या सामानाची यादीदेखील लिहून देत नाहीं. पण त्या महिलामंडळासाठीं मात्र रात्रीचा दिवस करून तावचे ताव लिहीत असतां.

**अप्पासाहेब :** महिलामंडळ हें निमित्त आहे केवळ. ( अभिमानाच्या स्वरांत ) मीं लिहिलं तें सात कोटी लोकांच्या मुक्ततेसाठीं.

**लीलाबाई :** म्हणजे ? हे कोण सात कोटी ?

**अप्पासाहेब :** ( त्याच आत्मगौरवाच्या तंद्रींत ) आपल्या देशांतील सात कोटी हरिजन बंधू. अस्पृश्योद्धार हा माझ्या नाटकाचा विषय आहे.

**लीलाबाई :** इश्श ! दुसरा कोणता विषय सांपडला नाहीं वाटतं ?

**अप्पासाहेब** : तुला कांहीं कळत नाहीं ! इश्श म्हणून तूं मध्यमवर्गीय लोकांची जीर्ण, संकुचित मनोवृत्ति प्रकट करीत आहेस. पांढरपेशांच्या या इश्श-वृत्तीनंच आपल्या समाजाचा नाश केला. (वक्त्याच्या अभिनिवेशानें) जोंपर्यंत हिंदुसमाजावरील अस्पृश्यतेचं लांच्छन पुसलं जाणार नाहीं, जोंपर्यंत ब्राह्मणापासून हरिजनापर्यंत सर्व जातीजमाती एक होणार नाहींत, तोंपर्यंत भारताचा उत्कर्ष होणार नाहीं, हें लक्षांत ठेव.

**लीलाबाई** : मी नाहीं असलं भलतंसलतं लक्षांत ठेवायची. सगळ्या जाती एक झाल्या तर सारा भ्रष्टाकार माजायचा ! मग कशाला हवा तो उत्कर्ष ?

**अप्पासाहेब** : श्रीमंत रघुनाथराव असंच—अगदीं असंच बोलतात. पण माझ्या अहिल्येनं त्याला जीं उत्तरें दिलीं आहेत तीं प्रत्येक माणसानं आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावीं अशीं आहेत. वा, वा !

**लीलाबाई** : ( संशयानें ) कोण ही अहिल्या ?

**अप्पासाहेब** : माझ्या या नाटकांतील नायिका. जन्मानं हरिजन आहे, पण वृत्तीनं अशी तडफदार, बुद्धीनं इतकी प्रखर, बोलण्यांत इतकी वाकबगार—जशी कांहीं आकाशांतील वीजच मूर्त रूप घेऊन पृथ्वीवर वावरायला आली आहे.

[ दारावरील बेल वाजते. ]

**लीलाबाई** : कोण आलंय् या भलत्या वेळीं ? हें घर म्हणजे लोकांना मंडईतल्या कट्ट्यासारखं वाटतं. केव्हांहि जावं आणि जेठा मारून बसावं—

[ बोलतां बोलतां दाराकडे जाते आणि तें दार उघडते. एक काळी-सांवळी तरतरीत चेहऱ्याची, डोक्यावरून पदर घेतलेली तरुणी दारांतून पुढें येते. लीलाबाई दचकून मागें होतात. अप्पासाहेब कुतूहलानें पाहतात. ]

**लीलाबाई** : अगबाई ! कोण तुम्ही ? कोण हवं आहे आपेल्याला ?

**तरुणी** : ( पुढें येऊन ) माझं नांव अहिल्या.

**अप्पासाहेब** : ( स्मित करीत ) काय योगायोग आहे ! माझ्या या नव्या नाटकांतील नायिकादेखील—

**अहिल्या** : तीच मी ! तीच मी ! तीच मी ! तुमच्या संगीत अस्पृश्योद्धाराची नायिका.

**अप्पासाहेब** : ( खुर्चीवरून ताडकन् उठून ) काय-काय म्हणतेस ?-तूं—
**लीलाबाई** : इश्श ! म्हणजे-पण-तूं—
**अहिल्या** : ( दोघांना हातानें थांबवीत ) हें पाहा, असा गलका करूं नका. मी पुन्हा सांगतें, संगीत अस्पृश्योद्धाराची नायिका अहिल्या ती मीच !
**अप्पासाहेब** : ( अगतिकपणानें खुर्चीवर बसून ) पण असं कसं होईल ? नाटकांतलीं माणसं अशीं नाटकाच्या बाहेर येऊं शकतात असं कधीं वाटलं नव्हतं मला.
**लीलाबाई** : बाई ग ! कांहीं तरी अघटितच आहे हें. पण मला अजून खरं वाटत नाहीं. आपली ऐकण्यांत किंवा यांची सांगण्यांत कांहीं तरी चूक झाली असावी. का हो बाई, तुम्ही खरोखरच यांच्या नाटकांतील नायिका आहांत ?
**अहिल्या** : हो, हो, हो ! अजून तुम्हांला संशय वाटतो ? बाबा, आईचं मला इतकं नवल वाटत नाहीं. पण तुम्ही तरी मला चटकन् ओळखायला हवं होतं.

संशय का मनिं आला ।।
अवचित जरि मी येत घराला ।।
संशय कां मनिं आला ।।

बाबा, तुमचीं पदं अजून आमच्यापर्यंत पोहोंचलीं नाहींत, म्हणून दुसऱ्या नाटकांतील पदांचा तूर्त उपयोग करतें. या अतिक्रमाबद्दल क्षमा करा हं—

संशय कां मनिं आला ।।
अवचित जरि मी येत घराला ।।
मी प्रिय तनया असुनी अपुली
ओळख नच कां अजुनी पटली
नमन जनकजननीला ।।

**लीलाबाई** : ए बाई, आम्हांला जनकजननी म्हणूं नकोस हो. तसं म्हटलं तर त्याचा अर्थ काय होतो, याची कल्पना आहे का तुला ?

**अहिल्या :** हो, तुम्ही दोघेंहि हरिजन ठरतां. पण मी काय करणार त्याला ? मला जन्माला घाला म्हणून मीं कांहीं धरणं धरलं नव्हतं तुमच्या दाराशीं. एरव्हीं आईबापांच्या जातीवरून मुलाची जात ठरते, पण आज मुलाच्या जातीवरून आईबापांची जात ठरायचा अपूर्व योग आला आहे. बाबा, इथें एक पद म्हणूं का ? बरी जागा आहे.

**लीलाबाई :** कांहीं नको ! अधेंमधें गळे काढायला इथें कांहीं नाटक नाहीं चाललेलं. ( सुन्न होऊन बसलेल्या अप्पासाहेबांकडे वळून ) पाहिलंत का, कसे परिणाम होतात तुमच्या लेखनाचे ! तरी मी पंधरा वर्षं कानींकपाळीं ओरडतें आहें कीं हा नाद चांगला नाहीं. बरं, लिहायचं झालं तर दुसरे विषय नव्हते का ?

**अप्पासाहेब :** अग–पण–त्या महिलामंडळानं सांगितलं—

**लीलाबाई :** चुलींत गेलं तें महिलामंडळ !

**अहिल्या :** तिथें तें जात नाहीं म्हणून तर या सगळ्या भानगडी होतात !

**लीलाबाई :** ( अहिल्येच्या बोलण्याकडे लक्ष न देतां ) त्यांना काय लागतंय् वाटेल तें सांगायला ? बंगलेवाल्यांच्या बायका. एकमेकींना पातळं दाखवण्यासाठीं मंडळं काढतात आणि तेवढ्यानं भागत नाहीं म्हणून नाटकं करतात. त्यांचं काम असलं म्हणजे तुमच्याहि उत्साहाला अगदीं ऊत येतो. आतां भोगा त्याचीं फळं ! रात्रीं अकरा वाजतां खुशाल एक अस्पृश्य बाई दार ठोठावून आंत येते—

**अप्पासाहेब :** थांब ग ! असा गोंगाट करूं नकोस उगीच तुझा कांहीं संबंध नाहीं यांत. माझं पात्र आहे तें.

**लीलाबाई :** बाई ग ! खुशाल या तरण्याताठ्या मुलीला माझं पात्र म्हणून म्हणतां ? जनाची नाहीं, पण मनाची तरी कांहीं ? त्या शारदाबाईची संगत बरं, त्या शारदाबाईची संगत बोलते आहे हें. अहो अहिल्याबाई, तुम्हीं आपल्या परत जा कशा. ऐकलंत ना यांचं बोलणं ? तुम्ही नाटकांतल्या झालात तरी तुम्हांलाहि लाजलज्जा, भीडमुरवत अगदींच नसेल असं नाहीं. जा आपल्या घरीं—

**अहिल्या :** आतां कुठें जाऊं मी या वेळीं ? अन् माझं घर तरी कोणतं ? हेंच नाहीं का माझं घर ? आणि यांच्यासंबंधीं म्हणाल तर उगाच भलता-

सलता संशय घेणं बरं नव्हे. ते पिताजी आहेत माझे. आतां संशयच घ्यायचा झाला तर पुराणांत दाखले आहेत; नाहींत असं नाहीं. ब्रह्मदेवाचेंच उदाहरण घ्या.

**लीलाबाई :** अहो बाई, पुराणाच्या गोष्टी तुमच्या तोंडून नकोत ऐकायला. आम्हांला सारं कांहीं ठाऊक आहे. अहो, बसलांत काय टकमका पाहात? तुम्हीच घालवा आतां तुमच्या या लेकीला. रात्रीच्या वेळीं मी नाहीं घरांत ठेवणार तिला !

**अप्पासाहेब :** ए, हें बघ, अशी गडबड करूं नकोस. आज इतकीं वर्षे मी लेखनाचा उद्योग करतों आहें; पण असा चमत्कारिक प्रसंग कधीं आला नव्हता. डोकं शांत ठेवून थोडा विचार केला पाहिजे. कांहीं तरी वाट काढली पाहिजे.

**लीलाबाई :** कांहीं तरी वाट काढून चालायचं नाहीं, मी सांगून ठेवतें. तिला सरळ बाहेरचा रस्ता दाखवायला हवा. मध्यरात्रीं अशा तरण्या पोरीला घरांत ठेवायचं म्हणजे काय? तें पाहा–तें पाहा–किती लगटपणानं वागते आहे ती! (अहिल्या अप्पासाहेबांकडे जाते आणि त्यांच्या केसावरून हात फिरविते, नंतर खुर्चीच्या हातावर बसते.) अगबाई! अगदीं तुम्हांला खेटून, तुमच्या खुर्चीवर बसली कीं. रामराम! आतां काय करूं मी?

**अहिल्या :** इतकं बिथरायला काय झालं हो तुम्हांला? मुलगी बापाच्या जवळ बसली म्हणून कांहीं बिघडतं वाटतं?

**लीलाबाई :** म्हणजे शंका आहे कीं काय? तूं कोण, आम्ही कोण, कांहीं विचार आहे कीं नाहीं? हरिजन म्हटलं म्हणून पूर्वीचे नेमधर्म नाहींसे होतात असें नाहीं. खरं म्हणजे, तुला या घरांतदेखील घेऊं देतां कामा नये.

**अप्पासाहेब :** हें–हें असं बोलणं बरं नाहीं हें. मानवता हा आजच्या युगाचा महामंत्र आहे. मानवता म्हणजे माणुसकी. माणुसकी सोडून माणसानं कधीं बोलूं नये. शिवाय असं बोलणं बेकायदाहि आहे सध्यां. अस्पृश्यता मानायची नाहीं असा कायदा आहे आतां. देशांतील सारीं माणसं समान! भारतीय घटनेच्या प्रस्तावनेंतच म्हटलं आहे असं. तूं वाचली नाहींस ती?

**लीलाबाई :** तुमच्या पुस्तकाच्या प्रस्तावनासुद्धां वाचीत नाहीं मी! तर म्हणे—

**अहिल्या :** त्यांच्या पुस्तकांच्या अर्पणपत्रिका तेवढ्या वाचीत असाल. स्त्रियांना आपल्या नवऱ्याच्या पुस्तकांतील तेवढीच एक गोष्ट काय ती महत्त्वाची वाटते. बाबा, काय हो तुमची अवस्था ही ! बाकी बायकांच्या बाबतींत बहुतेक लेखक असेच दुर्दैवी असतात म्हणा !

**लीलाबाई :** ए–काय ग बोलतेस चहाटळासारखी ? कांहीं जिभेला हाड तुझ्या ?

**अहिल्या :** ( उठून पुढें येते ) माझ्यामध्यें कांहीं दोष असतील तर त्याची जबाबदारी बाबांकडे आहे. कंसामध्यें त्यांनीं माझं वर्णन काय केलं आहे, ठाऊक आहे का ? प्रखर बुद्धीची, चपळ जिभेची, स्वाभिमानी, तडफदार, हरिजन असली तरी चांगली इंटरपर्यंत शिकलेली, एक काळीसांवळी पण दिसायला देखणी अशी मुलगी. विचारा हवं तर माझ्या बाबांना—

**लीलाबाई :** ते काय सांगणार आहेत कपाळ ! हें बघा हो, ही आत्तांच्या आत्तां घराबाहेर गेली नाहीं तर–तर—

**अहिल्या :** संगीत घराबाहेर ! आचार्य प्र. के. अत्रेकृत.

**लीलाबाई :** गप्प बैस तूं. हें बघा हो, मी निक्षून सांगतें, ही आत्तांच्या आत्तां घराबाहेर गेली नाहीं तर मी खिडकींतून खालीं उडी टाकीन. मग काय व्हायचं असेल तें होवो !

**अहिल्या :** काय व्हायचं आहे ? दुसरं लग्न करायची संधि मिळेल माझ्या बाबांना.

**लीलाबाई :** पाहा, पाहा कशी तारे तोडते आहे ! मी मेलें तरी दुसऱ्या लग्नाची संधि देणार नाहीं यांना, समजलीस ?

**अप्पासाहेब :** तें राहूं द्या हो ! मला बोलायची तरी संधि द्याल कीं नाहीं ? तूं आंत जाऊन झोंप पाहूं आतां—

**लीलाबाई :** मी झोंपूं ? अन् तुम्ही इथें जागे राहून काय करणार ? हो, बरी झोपेन मी. इथं जागत बसेन डोळ्यांत तेल घालून.

**अहिल्या :** तेल घाला नाहीं तर तूप घाला. जें व्हायचं तें होणारच.

**अप्पासाहेब :** ( उठून उभे राहतात ) थांबा थांबा ! मध्यरात्र व्हायला आली. कोट्या प्रतिकोट्या करायची वेळ नाहीं ही. अहिल्ये, मला

अगोदर हें सांग, तूं अशी नाटकाच्या बाहेर कां आलीस? मीं जिवंत पात्र रंगवलं खरं, पण तें इतकं जिवंत व्हावं अशी इच्छा नव्हती माझी.

**अहिल्या :** तुमच्या या इच्छा नडायला लागल्या म्हणून तर बाहेर पडलें मी. तुमची इच्छा अशी कीं, मी कागदांतल्या कागदांत राहून त्या चंद्रकांताशीं लग्न करावं. त्याच्यावरतीं मला प्रेमहि करायला लावलंत तुम्हीं. पण शेवटच्या अंकांत त्याच्या जन्माची भानगड दाखवून सगळा घोटाळा केलात.

**अप्पासाहेब :** काय घोटाळा झाला?

**अहिल्या :** घोटाळा नाहीं तर काय? आबा परांजप्यांचा मुलगा म्हणून त्याचा माझा परिचय झाला. आबा परांजप्यांचा मुलगा म्हणूनच त्यानं माझ्यावर आणि मीं त्याच्यावर प्रेम केलं. केवढीं मोठीं सुखस्वप्नं रंगवीत होतों आम्ही! त्यांना अस्पृश्योद्धार करायची संधि मिळाली असती अन् मलाहि निदान एका ब्राह्मणाचा तरी उद्धार करतां आला असता. पण शेवटीं सगळं मुसळ केरांत. तिसऱ्या अंकांत तुम्हीं त्याला हरिजनाचाच मुलगा ठरवलात, एका जुन्या नाटकाचा आधार घेऊन. बाबा, बाबा, किती कठोर, किती कठीण हृदय आहे हो तुमचं! बोलतां बोलतां, लिहितां लिहितां, माझ्या जीवनाचा-माझ्या संसाराचा असा खेळखंडोबा करून ठेवलात! आतां मात्र एक पद म्हणणारच मी.

पद

कठिण कठिण कठिण किती
लेखकमन बाई ॥
कन्येचा जीवनपट
उधळुनिया देई ॥
जन्मरहस्यें भलतीं
दावुनिया हीं नसतीं
पात्रासह नासतात—
कागद अन् शाई ॥

**अप्पासाहेब :** तूं पुस्तकी जगांत वावरतेस. या समाजांतील परिस्थितीची तुला कल्पना नाहीं. ब्राह्मण-अस्पृश्य विवाह दाखविला तर महिलामंडळांतील साऱ्या महिला खवळून जातील ना ! म्हणून चंद्रकांताच्या जन्माचं रहस्य मला दाखवावं लागलं.

**अहिल्या :** एवढंच करून थांबला नाहींत तुम्ही ! आणखीहि दोन जन्म-रहस्याच्या भानगडी घातल्यात शेवटीं. अप्रिय सुधारणा सुसह्य करण्याची ही एक गुरुकिल्लीच सांपडली तुम्हांला. आमचा महादेव म्हणजे अगदीं जाज्वल्य हरिजन. मीं ब्राह्मणाशीं लग्न करावं हेंदेखील त्याला मान्य नाहीं. मिश्रविवाह झाले तर ते प्रतिलोमच व्हायला हवेत असं मानणारा तो. पण त्याला अखेरी जन्मानं खानदानी मराठा ठरवून तुम्हीं त्याचा चोळामोळा करून टाकलात. फुटलेल्या फुग्यासारखा बिचारा अगदीं निर्जीव आणि गलितगात्र होऊन पडला आहे. आणि त्याचं प्रेम ज्या सारस्वत मुलीवर, तिला ऐन लग्नाच्या वेळीं चांभार ठरवून टाकलंत तुम्हीं. बाई बाई ! काय हे जन्मरहस्याचे घोटाळे ! अशा भानगडी होण्यापेक्षां जन्माला न येणंच बरं. हा कसला मेला अस्पृश्योद्धार ! अशा उद्धारकर्त्या मित्रापेक्षां शंभर टक्के वैर करणारे शत्रू पुरवले.

**अप्पासाहेब :** हें पाहा, तुला कांहीं कळत नाहीं यांतलं. अग, अशा क्रांतिकारक सुधारणा पायरीपायरीनंच व्हायला हव्यात आणि पायरी-पायरीनंच त्या लोकांना पटवून द्यायला हव्यात. लेखक हा परिस्थितीचा गुलाम असतो. सामाजिक दुराग्रहांच्या शृंखलांत त्याची प्रतिभा बांधलेली असते. ठाऊक आहे ?

**अहिल्या :** मग या शृंखला गळ्यांत घालून स्वस्थ बसा कीं ! हा लिहिण्याचा बोजा तुमच्या मानेवर ठेवलाय् कुणीं ? बाबा, क्षमा करा मला. तुमची कन्या असून तुम्हांला असं कठोर बोलावं लागतंय्. पण या दुबळेपणाचा आणि दांभिकतेचा वीट आला आहे मला. ज्याला सत्याकडे डोळे उघडून पाहायचा धीर नाहीं, त्यानं या फंदांत पडावं कशाला ? आशुक-माशुकांच्या गोष्टी काय कमी आहेत ? तिसऱ्या अंकापर्यंत आम्ही सारीजणं किती सुखी होतों. आम्ही सारे आपापल्या परिस्थितीशीं मोठ्या आवेशानं आणि निग्रहानं लढत होतों. पण शेवटीं आपल्या हातांत

लांकडाच्या तलवारी आहेत अन् तोंडावर विदूषकाचे मुखवटे आहेत हें आम्हांला कळून आलं. असं वाटलं कीं या कागदाच्या भिंती फोडाव्यात आणि बाहेर पळून जावं. अन् शेवटीं पळालेंच मी. हा कसला उद्धार आमचा ! शेरभर दुधांत दोन शेर पाणी घातलेलं मिश्रण हें. धड दुधाची गोडी नाहीं, धड पाण्याची चव नाहीं.

**अप्पासाहेब :** अग, मग काय वरच्या जातींतली मुलगी खालच्या जातींत लग्न करते असं दाखवूं ? महिलामंडळाला कसं खपेल तें ! मंडळांतल्या त्या शारदाबाई, त्या उमाबाई, त्या सुनंदाताई, त्या निर्मलादेवी——

**लीलाबाई :** अहो, ही काय संध्या म्हणतां कीं काय ? मी पुन्हा सांगतें, चुलींत गेलं तें महिलामंडळ आणि त्यांतल्या त्या सगळ्या बाई, ताई आणि देवी ! मी काय सांगतें तें ऐका. उद्यां उठल्याबरोबर तें नाटकाचं बाड आणा आणि फाडून टाका. नाहीं तर मीच माझ्या हातानं घालीन तें बंबामध्यें. मुळींच अशीं वेडींवांकडीं लग्नं दाखवायचीं नाहींत. सगळा भ्रष्टाकार मेला !

[ एक खिडकी धाडकन् उघडली जाते आणि एक तापट उग्र चेहऱ्याचा तरुण आंत डोकें काढतो. ]

**तरुण :** भ्रष्टाकार ! भ्रष्टाकार ! ऐकलंस अहिल्ये, मी पहिल्यापासून सांगत होतों तुला ! सापाचं विष फक्त दांतांत असतं, पण हीं पांढरपेशी माणसं आपादमस्तक जहरानं भरलेलीं असतात. आतां समजलं ?

**अहिल्या :** महादेव ! तूंहि आलास ?

**लीलाबाई :** हा कोण मेला खिडकींतून आंत आला ? अहो, उठा तरी, चोर दिसतो आहे !

[ महादेव आंत येतो. ]

**महादेव :** आईसाहेब, मी चोर नाहीं. आपल्या पतिराजांचा मी पुत्र आहें. कंसांत म्हटल्याप्रमाणें ज्याच्या शब्दाशब्दांतून अभिमानाची आग उसळते आहे तो महादेव. विचारा हवं तर पिताजींना. पण आतां यांना पिता म्हणायची मला शरम वाटते. शेवटच्या प्रवेशांत एखाद्या खाटका-प्रमाणें त्यांनी माझा गळा कापला. ( ओरडून ) पण अहिल्ये, मी बजावून सांगतों, माझं कांहीं झालं असलं तरी तुझं मात्र मी कांहीं तरीच होऊं देणार नाहीं. तूं त्या चंद्रकांताशीं लग्न करतां कामा नये.

[ दुसऱ्या खिडकींतून दुसरा एक तरुण उडी मारून आंत येतो. ]

**तरुण** : हा चंद्रकांतच आतां अहिल्येशीं लग्न करायला तयार नाहीं.

**अप्पासाहेब** : तूं चंद्रकांत ?

**चंद्रकांत** : होय, बाबासाहेब, मीच आपला चंद्रकांत. स्वप्नाळू, भाबडा आणि काव्यात्म वृत्तीचा. हीं दोघं पळालेलीं पाहून मींहि पळ काढला. मी भाबडा असलों तरी मलाहि थोडीफार अक्कल आहे.

**लीलाबाई** : अहो, त्या खिडक्या तरी लावून घ्या. कितीजणं भुतासारखीं आंत येणार आहेत कुणास ठाऊक !

**चंद्रकांत** : होय, मी भूतच आहें आतां. जिवापलीकडे जतन केलेल्या महत्त्वाकांक्षा जळून गेल्यावर जिवंतपणा तरी कोणता उरणार ?

**अहिल्या** : कां हो, तुम्ही अप्पासाहेबांच्या नाटकांतून आलांत कीं गडकऱ्यांच्या ? ही जकाराची बाराखडी गुंफायला तुम्हांला कांहीं वाटत नाहीं का ?

**चंद्रकांत** : त्याचं कारण बाबासाहेबांनाच विचार. माझीं अनेक भाषणं लिहितांना ते गडकऱ्यांचीं नाटकं चाळीत होते. जाऊं द्या. आतां काय त्याचं ? ( एकदम नाटकी स्वरांत ) होत्याचं नव्हतं झालं. हा मानी मनाचा चंद्रकांत आतां दुबळ्या दिलाचा दगड झाला. तेजस्वी तारकांचा लोभ धरला पण हातांत पाजळलेले कोळसे आले. ( टाहो फोडीत ) करायला गेलों काय, आणि झालं काय ? हाय रे नशिबा !

[ कपाळावर हात मारीत खालीं बसतो. ]

**लीलाबाई** : ए ! भरल्या घरांत कां असे हंबरडे फोडतोस ! अहो, ही सारी भुतावळ बाहेर घालवून द्या पाहूं ! नाहीं तर आतां मात्र खरोखर खिडकींतून उडी टाकीन मी !

**चंद्रकांत** : ( उठून उभा राहतो ) चला, आईसाहेब, आपण बरोबरच उड्या टाकूं. जगण्यासारखं कांहीं जवळ आहे तोंपर्यंतच मरणांत मौज आहे. अरेरे ! पण आतां जगण्यासारखंसुद्धां कांहीं जवळ उरलं नाहीं.

**अहिल्या** : मग आतां मरणांत तरी काय मौज आहे ? आतां जगा आणि माझ्याशीं लग्न करा. पुढें काय व्हायचं असेल तें होईलच.

**चंद्रकांत** : तुझ्याशीं लग्न ? ( विकट हास्य करतो ) या जन्मीं, म्हणजे या नाटकांत तरी शक्य नाहीं तें.

**अप्पासाहेब** : अरे, पण झालं काय तुला ?

**चंद्रकांत** : काय व्हायचं राहिलं आतां ? माझं प्रेम काय अहिल्येच्या तीन हात शरीरावर होतं, असं आपण समजतां ? अहिल्येपेक्षां अधिक सुंदर, अधिक बुद्धिवान् मुली आमच्या एका गल्लीमध्यें निदान डझनभर असतील. नाहीं, अहिल्ये, मी तुझ्याशीं लग्न करणार होतों तें अस्पृश्योद्धाराचा एक उज्ज्वल आदर्श समाजापुढें ठेवण्यासाठीं. पण शेवटीं उघडकीस आलेल्या माझ्या जन्मरहस्यामुळें ही महत्त्वाकांक्षा मातीला मिळाली. अहिल्ये, मी आतां कालत्रयीं तुझ्याशीं लग्न करणार नाहीं. अगदीं दगडावची रेघ आहे ही.

**अहिल्या** : ( अगतिकतेनें ) मग आतां कुणाशीं लग्न करूं मी ? महादेव, तूं तरी—

**महादेव** : कांहीं तरी बोलूं नकोस. बालपणापासून मीं तुला बहिणीसारखं मानलं आहे.

**अहिल्या** : अरे, मानलेलं नातं तें. म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाहीं.

**महादेव** : तें सर्वस्वीं अशक्य आहे ! मी कुणाशींच लग्न करणार नाहीं. ब्रह्मचारी राहायची शपथ घेतली आहे मीं.

**चंद्रकांत** : आणि मीहि !

**अप्पासाहेब** : हें पहा, मंडळी – जरा डोक्यानं विचार करा. आपली सामाजिक परिस्थिति—

**महादेव** : सामाजिक परिस्थिति गेली खड्ड्यांत !

**अप्पासाहेब** : अरे पण – हें नाटक व्हायचं तरी कसं मग ? तुम्ही सारेच असा दुराग्रह धरायला लागलात तर व्हायचं कसं ?

**चंद्रकांत** : कांहीं तरी होण्यापेक्षा अजिबात कांहीं न होणं चांगलं. बाबासाहेब, आम्ही नाटकांतलीं पात्रें आहोंत, पण आम्हांलाहि थोडाफार स्वाभिमान आहे, स्वत्व आहे. अशा निःसत्त्व भोंगळ जीवनाचा स्वीकार करण्यापेक्षां आम्हीं जंगलांत जाऊन सुखानं राहूं. चल महादेव, चल अहिल्ये, या नाटकाचा त्याग करून आपण दूर दूर क्षितिजाकडे जाऊं.

**महादेव** : चला, या नाटकांत अर्थ नाहीं, अन् नाटककारांतहि नाहीं. चल अहिल्ये—

**अहिल्या :** चला, मीं पहिल्या अंकांत प्रवेश केला तेव्हांच मला वाटलं कीं अशी कांहीं तरी भानगड होणार आहे. बाबा, आई, आम्ही निरोप घेतों आपला आपल्याला सोडून जाणं जिवावर येतं. पण जाण्यावांचून गत्यंतर नाहीं आतां. कारण— माफ करा— शेवटचं एकच पद म्हणते आता.

धिक्कार मन साहिना ।
अपमानशल्य तें विषसमचि जीवना ॥
अभिमान रक्षित ना जरी ।
ना स्वर्गही रुचतो मना ॥

[ तिघेजण धिक्कार – धिक्कार – म्हणत बाहेर निघून जातात ]

**अप्पासाहेब :** ( ओरडून, त्यांच्या मागें जात ) अरे – अरे – थांबा – थांबा – ! गेले, गेले सगळे ! आतां त्या महिलामंडळाला काय सांगूं ? त्या शारदाबाई, त्या उमाबाई, त्या निर्मलादेवी, त्या सुनंदाताई –

**लीलाबाई :** पुन्हा लागलात का ती संध्या म्हणायला ? आतां त्या महिला-मंडळाचं नांवदेखील घेतलं तर खपायचं नाहीं मला, मी सांगून ठेवतें. अन् कोणतंहि नाटक लिहायचं झालं तर अगोदर मला त्याचं टांचण दाखवलं पाहिजे. असा प्रसंग पुन्हां यायला नको. चला, तीं दारं लावून टाका, अन् दिवा मालवून झोपायला या. पुष्कळ झालं.

[ आंत जाते ]

**अप्पासाहेब :** ( खुर्चीवर बसतो ) अरे राम ! मी झोंपेंत आहें कीं जागा आहें कुणास ठाऊक !

—: प ड दा :—

: ३ :

# कल्याणला पेशवाई

## दृष्य १

[ कल्याण स्टेशनवरील दुसऱ्या वर्गाचें प्रतीक्षालय. दुपारचे अडीच वाजण्याचा सुमार. तुमच्या आमच्यासारखा एक पांथस्थ प्रतीक्षालयांतील विशाल व अवजड आरामखुर्चीमध्यें पडून वर्तमानपत्र वाचीत आहे. रेलतळावरील नानाविध आवाज सभोंवार ऐकूं येत आहेत. नुकतेंच भोजन झाल्यामुळें पांथस्थाच्या डोळ्यांवर निद्रेचा अंमल बसूं लागला आहे. तो एकदां हातघड्याळाकडे पाहतो आणि प्रतीक्षालयांतून शॉर्ट कट घेणाऱ्या एका हमालाला विचारतो. ]

" मद्रास किती लेट आहे बाबा ? "

" अजून तास दीडतास तरी येत नांहीं ! " हमाल उत्तरतो व बाहेर निघून जातो.

पांथस्थ स्वतःशीं पुटपुटतो, " दीड तास लेट ! शुद्ध पेशवाई माजली आहे — शुद्ध — शुद्ध पे - श - वा - ई ! "

एकदां सभोंवार पेंगलेली नजर टाकून तो तोंडावर वर्तमानपत्र पांघरुणासारखें घेतो आणि झोपीं जातो.

क्षणभरानें शेजारीं बसलेला एक सहप्रवासी पांथस्थाच्या मुखावरील वर्तमानपत्र हलकेंच उचलतो आणि मथळे पाहून तें पूर्ववत् त्याच्या तोंडावर पसरून देतो.

पांथस्थ अर्थात् गाढ झोपलेला आहे.

## दृश्य २

[ तेंच स्थळ. परंतु आतां फलाटावरचा कांहीं भाग दिसत आहे. कल्याण स्टेशन भूतकाळांत जाऊन पेशवाईत दाखल झाल्याचीं

चिन्हें सर्वत्र प्रकट होत आहेत. फलाटावर बाकांच्या ऐवजीं देशी बैठकी टाकलेल्या असून लहान-मोठीं गांठोडीं घेतलेले उतारू इतस्ततः पेंगत पडलेले आहेत. मराठेशाही पोशाख केलेलीं कांहीं माणसें इकडून तिकडे जात आहेत. वेळ अर्थात् पहिल्या दृश्यांतील.

अशिस्टंट स्टेशनमास्तरच्या खोलीचें दार धाडकन् उघडतें आणि कल्याण जंक्शनचे अ. स्टे. मा. हंबीरराव हिंदुराव फसलकर हे रागारागानें बाहेर येतात. हंबीररावांचा वेष—सुरवार, अंगरखा, मराठेशाही पगडी, चढाव व खांद्यावर टाकलेलें एक रेशीमकांठी उपरणें असा आहे. ते संतापानें सभोंवार पाहतात, फिरतात व नंतर बोलूं लागतात. ]

**हंबीरराव** : सगळा सावळागोंधळ माजला आहे !...कुठं गेले आहेत सगळे लेकाचे कुणास ठाऊक !

[ जवळच्च एका तिपाईवर पडलेली एक घंटा उचलतो व ती जोरजोरानें वाजवतो. नंतर तारस्वरांत– ]

अहो अप्पाशास्त्री भिडे, अहो माणकोजी कावळे, अहो रुद्रटराव शेंडे, अहो बबनराव जाधव–

[ एक उतारू आपल्या बायकोमुलासह गांठोडीं सांवरीत घाई-घाईनें धडपडत येतो. ]

**उतारू** : साहेब, गाडी आली वाटतं ?

**हंबीरराव** : कोणतीहि गाडी आली नाहीं. अन् तास दोन तास येणार नाहीं ! पुन्हा गाडीच्या बाबतींत मला विचारूं नका.

**उतारू** : तुम्हीं घंटा वाजवली म्हणून वाटलं गाडी आली कीं काय ?

**हंबीरराव** : या घंटेचा अन् गाडीचा कांहीं संबंध नाहीं. तळावरचे सगळे अधिकारी नोकर बेपत्ता झाले आहेत. त्यांच्यासाठीं घंटा वाजवली मीं. मी एकटा इथं काय कपाळ करणार ?—जा आतां, गाडीची घंटा दिली म्हणजे कळवूं तुम्हांला.

**उतारू** : पण सिग्नल तर मघाशीं एकदां पडला होता–

**हंबीरराव** : अहो, सिग्नल पाडायला आहे कोण जागेवर ! त्या बबनरावचीं

कार्टी सिमलच्या खांबावर चढतात आणि पट्ट्या खालीं ओढतात. शंभरदां बबनरावाला सांगितलं कीं तुझीं पोरं हीं अशीं मोकळीं सोडूं नकोस म्हणून. त्यांनींच मघाशीं खालीं पाडला होता तो. आतां पक्का तारा लावून वरती बांधला आहे. बिशाद आहे आतां खालीं पडेल !

**उतारू :** असो ! मग आम्ही पडतों पुन्हा. चल ग ए ! चला रे–

[ उतारू परिवारासह जातो. ]

**हंबीरराव :** ( पुन्हा घंटा वाजवून ) अहो अप्पाशास्त्री, अहो रुद्रराव–

**अप्पाशास्त्री :** ( लांबून ) आलों, आलों !

**हंबीरराव :** लेकाचा कुठें तरी संकल्प सांगून तसाच इकडे आलेला दिसतो. सोवळंदेखील सोडलं नाहीं. हातांत पळी-पंचपात्रीहि दिसते आहे. वाहवा ! असे मदतनीस अधिकारी हवेत !

[ अप्पाशास्त्री धांवत धांवत प्रवेश करतो. तो मुकटा नेसलेला असून खांद्यावर शाल घेतलेली आहे. हातांत पळी-पंचपात्री. ]

**अप्पाशास्त्री :** आपण मला हांक मारलीत का ?

**हंबीरराव :** हो ! तुम्हांला काय, सगळ्यांनाच हांका मारतों आहें मी.

**अप्पाशास्त्री :** किमर्थम् ?

**हंबीरराव :** तुमचं संस्कृत जाऊं द्या खड्ड्यांत ! तुमचा गणवेश कुठं आहे ? असं मुकटा नेसून अन् शाल पांघरून इथं कामावर यायचं नाहीं म्हणून कितीदां बजावलं तुम्हांला ?

**अप्पाशास्त्री :** पण मी कामावर आलों नाहीं आतां. जवळचा रस्ता म्हणून रुळावरून चाललों होतों पलीकडे–घरीं !

**हंबीरराव :** कुठं गेलां होतां ?

**अप्पाशास्त्री :** म्हणजे तुम्हांला ठाऊकच नाहीं का ? आज जिल्ह्याचे सुभेदारसाहेब खान सलामतखान गार्दी इथं एका बंगल्यांत मुक्कामाला आले आहेत.

**हंबीरराव :** ( कांहीं बोध न होऊन ) बरं मग ?

**अप्पाशास्त्री :** पंचरत्नेश्वर मंदिरांतील श्रावणी समारंभाचं उद्घाटन आज सुभेदारसाहेबांच्या हस्तें होतं. म्लेंच्छ असूनहि फार धार्मिक वृत्तीचे. शहरांतील सर्व सत्पात्र ब्राह्मणांचा त्यांनीं आदरसत्कार करून त्यांना दक्षिणा दिल्या.

**हंबीरराव** : अहो पण–

**अप्पाशास्त्री** : एकेक अवेळी सरोस–गाडीतळावरच्या लोकांना पावली–पावली अधिक दिली! तिकडेच भोजन आटोपून आतां घरीं चाललों होतों. म्हटलं घरीं जावं, पोषाख बदलावा आणि—

**हंबीरराव** : अहो पण अप्पाशास्त्री, तुमच्या इथल्या कामाची वेळ काय?

**अप्पाशास्त्री** : सूर्योदयापासून दुपारीं चार वाजेतों—

**हंबीरराव** : मग कामाच्या वेळांत श्रावण्या करायला आणि भोजनं झोडायला तुम्हांला कांहीं वाटत नाहीं?–हे रुद्रटराव शेंडे आले!

[ रुद्रटराव चोरपावलानें येऊन उभे राहतात. ]

कां हो रुद्रटराव, सकाळीं दहा वाजतां एक बोट वर करून तुम्ही जे फरारी झालांत ते आतां उगवतां आहांत?

**रुद्रटराव** : ( खालीं मान घालून ) माझ्या मावसभावाच्या मुलाचं जावळ काढायचं होतं आज. तो वाटेंत भेटला—

**हंबीरराव** : अन् तुम्हांला जावळ काढायला नेलं! तोच धंदा करायला घ्या आतां. इथले नेमधर्म जमायचे नाहींत तुम्हांला! म्हणे मावसभाऊ भेटला! इथें उतारूंना तिकिटं कोण देणार?

**रुद्रटराव** : सगळ्या पांथस्थांना पत्रिका देऊन गेलों होतों साहेब. कुणीहि तिकिटाशिवाय राहिला नाहीं. नंतर म्हटलं, आतां गाड्या येण्याचा संभव नाहीं, तर चक्कर मारून यावं—

**हंबीरराव** : गाड्या येणार कशा? चारी बाजूंला सकाळपासून गाड्या शिट्ट्या फुंकीत बसल्या आहेत!

**अप्पाशास्त्री** : अस्सं! पण आज गाड्या बंद ठेवायचा विचार होता ना?

**हंबीरराव** : आज काय, तुमच्या—

**अप्पाशास्त्री** : नाहीं म्हटलं आज सर्वत्र श्रावण्या आहेत. पुणेंनगरींत-देखील आजच श्रावण्यांची दंगल असते. खुद्द श्रीमंत सरकार आज श्रावणी करायला रामेश्वर मंदिरांत जातात.

**हंबीरराव** : ( अगतिकतेनें ) अहो अप्पाशास्त्री, ही रूळगाडी आहे. चाकण-सासवडची बैलगाडी नाहीं इथें!

**अप्पाशास्त्री** : नाहीं–मला तरी काय कल्पना? सकाळीं खुद्द बाळाजी

आवजी आज सुटी आहे किंवा सुटी घेतली पाहिजे, असं कांहीं तरी त्या खाद्यगृहाच्या मक्तेदाराजवळ बोलत होते. म्हटलं, सर्वप्रमुखाची—त्याला टोपीवाले स्टेशनमास्तर म्हणतात नाहीं का?—सर्वप्रमुखाची इच्छा. तिथें अडचण कसली ? सकल्पाच्या पाठोपाठ सिद्धि धांवतच येणार !

**हंबीरराव :** वशिल्याच्या पाठोपाठ म्हणा ! हे बाळाजी आवजी म्हणजे कारभाऱ्यांच्या गोतावळ्यांतले. तेवढ्या भांडवलावर हा हुद्दा मिळवला त्यांनीं. कामांत तर लक्ष नाहींच, पण तळावरतीं हजरहि राहात नाहींत——

**अप्पाशास्त्री :** त्यांचं नवं कुटुंब आहे ना ! म्हणून सध्यां जरा घराकडे ओढा जास्त. नव्याचे नऊ दिवस संपले कीं इथेंच मुक्कामाला येतील.

**हंबीरराव :** पण तोंपर्यंत इथें गाड्यांवर गाड्या चढतील त्याची काय वाट ? हजारों माणसांच्या जीवन-मरणाचा सवाल आहे हा, शास्त्रीबुवा !

**अप्पाशास्त्री :** तुम्ही म्हणतां त्यांत अगदींच सत्यांश नाहीं असं नाहीं, साहेब. पण खरं म्हणजे असं आहे कीं, ज्याचं नशीब त्याच्याबरोबर असतं. आपण कांहीं केलं वा न केलं, तरी मरणारे मरणार आणि जगणारे जगणार ! आपण आपले निमित्तमात्र.

**हंबीरराव** . अहो, पण या समयसारण्या —

**अप्पाशास्त्री :** तें सारं ठीक आहे ! समयसारण्या छापाव्यात, नियम करावेत, सिग्नलीच्या पट्ट्या खालीं-वर ओढाव्यात, शिट्ट्या फुंकाव्यात, घंटा वाजवाव्यात—अनासक्त बुद्धीनं हें सारं कर्म करायलाच हवं. पण अखेरी म्हणाल तर यावरती कांहीं अवलंबून नाहीं. ग्रहमान जसं असेल तसं होईल. काय हो रुद्रटराव ?

**रुद्रटराव :** हो—तेंहि खरंच.

**अप्पाशास्त्री :** म्हणून म्हणतों फसलकरसाहेब, तुम्ही वरिष्ठ आहांत माझ्यापेक्षां, पण मीं दोन पावसाळे जास्त पाहिले आहेत. या नेमधर्मांच्या गोष्टी इतक्या जिवाला लावून घेऊं नये ! परिस्थिति पाहून माणसानं वागावं हें उत्तम. आतां हेंच बघा, इथून नाशिक क्षेत्राच्या तिकिटाचं मूल्य साडेतीन रुपये आहे. पण काळ वेळ पाहून आज रुद्रटरावांनीं दोन दोन रुपयाला नाशिकचीं तिकिटं सोडलीं !

**हंबीरराव :** ( कपाळाला हात लावून ) अहो, काय म्हणतां? दोन रुपयाला तिकिटं सोडलीं ?

**रुद्रटराव :** ( खालीं मान घालून नम्रतेनें ) प्रथम विचार नव्हता तसा साहेब. पण लोक फारच घासाघिशी करायला लागले. शेवटीं म्हटलं, जाऊं द्या. सध्या नाशिक क्षेत्रीं सिंहस्थ आहे. सरकारनं क्षेत्रस्थानीं फार चोख व्यवस्था केली; पण यात्रेकरू जात नाहींत अशी वदंता आहे. म्हटलं हे तरी जाऊं द्यावेत. शिवाय बिचाऱ्यांना तिथं गंगाघाटीं कांहीं तरी खर्च करावा लागतोच——

**हंबीरराव :** हं ! ठीक आहे ! आतां वरिष्ठ आले म्हणजे सांगा हें त्यांना.

**रुद्रटराव :** बाळाजीपंतांच्या कानावर घातली आहे हकीगत ही.

**हंबीरराव :** मग– काय म्हणाले ?

**रुद्रटराव :** ( कौतुकानें ) रागावले नाहींत. उलट शाबासकी दिली त्यांनीं. म्हणाले, धर्माला उत्तेजन देणं हें प्रत्येकाचं पहिलं कर्तव्य. मग तो पुण्याचा कारभारी असो किंवा कल्याणचा तिकिटमास्तर असो !

**हंबीरराव :** छान ! वरचे तसे आणि खालचे असे ! आम्ही मात्र मधल्यामध्यें उगाच जीव जाळीत बसतों.

**अप्पाशास्त्री :** ( हातावर तंबाखू चोळीत ) तेंच सांगतों मी——ग्रहमान जसं असेल——

**हंबीरराव :** ग्रहमान गेलं जहन्नममध्यें ! इथें पिचकाऱ्या टाकूं नका म्हणून सांगितलं ना तुम्हांला ?

**अप्पाशास्त्री :** ( तोंड पुशीत ) क्यूं ?

**हंबीरराव :** क्यूं ? आपण दिवसांतून छप्पन्न वेळां प्रवाशांना सांगतों कीं इथें पिचकाऱ्या मारायच्या नाहींत म्हणून !

**अप्पाशास्त्री :** त्यांना सांगावं हें उचितच आहे. पण आपल्यावरती हें बंधन कशाला ? आपल्या घरांत आपण वाटेल तें करूं !

**हंबीरराव :** हें आपलं घर ! आणि आपल्या घरांत वाटेल तें करायचं ! अजब आहे सगळं. बरं, आतां ही फालतू चर्चा पुष्कळ झाली. कल्याणच्या अवतीभवती सहा गाड्या कोकलत उभ्या आहेत. शिवाय मालगाड्या, एंजिनं आणि स्थानिक गाड्या जागोजाग अडकून पडल्या आहेत त्या

वेगळ्याच ! सांधेखात्याचा तो बबनराव जाधव कुठें परागंदा झाला देव जाणे. त्याची माणसंहि नाहींत कामावर.

**रुद्रटराव :** मी गांवांतून आलों तेव्हां बबनराव शिकलकराकडे चाललेला दिसला मला ! तरवार घेऊन चालला होता.

**हंबीरराव :** तरवार ?

**रुद्रटराव :** होय, तो म्हणाला—पण हा आलाच—होय, बबनरावच हा !

[ सारेजण आश्चर्यानें बबनराव येतो त्या दिशेला पाहतात. पोशाखांत सरदारी झाक असलेला बबनराव तरवारीचे हात करीत प्रवेश करतो. ]

**हंबीरराव :** अहो बबनराव, शुद्धीवर आहांत का ? हें काय पानिपतचं रणांगण आहे कीं कल्याणचं स्टेशन आहे ? तरवार काय फिरवीत आलांत ?

**बबनराव :** ( घोषणेच्या स्वरांत ) हर हर महादेव ! बोला–हर हर महादेव ! बोला—

**रुद्रटराव :** ( घाबरून हलक्या आवाजांत पुटपुटतो ) हर हर महादेव—

**हंबीरराव :** रुद्रटराव शेंडे, तुम्हांलाहि खूळ भरलं काय ?

**बबनराव :** खूळ नाहीं फसलकरसाहिब हें ! हें कृष्णाकोयनेचं पाणी आहे. हा सह्याद्रीच्या पहाडाचा आवाज आहे. ही मावळखोऱ्यांतली मर्दुमकी आहे. हा मराठी मनगटाचा दिमाख आहे. हें—

**अप्पाशास्त्री :** सगळं कांहीं लक्षांत आलं ! पण सांधेवालेसाहेब, आतां या घटकेला आणि इथें फलाटावर असं शिरा ताणायचं काय प्रयोजन ? आम्हीहि कृष्णा-कोयनेवर आचमनं घेतलेलीं आहेत. आमच्यासमोर त्या पाण्याचा डौल कां मिरवतां ?

**बबनराव :** ( तरवार म्यानांत घालून व आवाज उतरवून ) तुमचा संबंध नाहीं या तरवारीशीं—

**अप्पाशास्त्री :** तो कधींहि न येवो, हीच ईश्वराच्या चरणीं प्रार्थना !

**बबनराव :** मला त्या पंजाबी धटिंगणाचा नक्षा उतरवावयाचा आहे.

**हंबीरराव :** कोणता पंजाबी ?

**बबनराव :** त्या पंजाब–गाडीचा एंजिनवाला. केबिनजवळून गाडी जोरांत

काढतो आणि जातां जातां मला तोंड बाहेर काढून शिव्या देतो ! काल मीं त्याला द्वंद्वाला आव्हान दिलं तर म्हणाला, ' अबे जा रे पहाडका चुवा, तुम क्या शेर के साथ लढेंगे ? ' आज त्याची गाडी यायची वेळ झाली कीं रुळाजवळच उभा राहतों तरवार घेऊन. कांहीं वेडवांकडं बोलला कीं तसाच खेंचतों खालीं हात धरून, आणि मग दाखवतों शेर कोण अन् चुवा कोण !

**हंबीरराव :** अन् सांधेखात्यांतलं तुमचं काम करायला कोणी स्वर्गातलं खालीं उतरणार आहे का ? सकाळपासून तुमचा पत्ता नाहीं. तुम्हांला शंभरदा बजावलं आहे कीं कचेरीच्या वेळांत त्या आचाऱ्यांच्या अड्ड्यावर जाऊन भांग ढोसायची नाहीं म्हणून ! आतां पुन्हा असे भांग झोकून आलांत तर बडतर्फ करीन तुम्हांला !

**बबनराव :** ( एकदम रडूं लागतो ) मला बडतर्फ करणार ? साहेब, मी तुमच्या पायां पडतों–तुम्हां सर्वांच्या पायां पडतों–घरीं बायको आहे,–म्हातारी आई आहे–चार कच्चींबच्चीं आहेत ! फसलकरसाहेब,–मी—

**हंबीरराव :** रुद्रटराव, त्यांना धरून त्या नळावर न्या आणि दहा मिनिटं त्यांचं डोकं पाण्याच्या धारेमध्यें दाबून धरा–जा–! त्याच्याशिवाय शुद्धीवर नाहीं यायचे ते

**बबनराव :** रुद्रटराव, तुम्ही आमचे–दोस्त–अगदीं जिवलग——

[ रुद्रटराव त्याला ओढून नेतो ]

**हंबीरराव :** ( डोकें हातानें दाबून ) अप्पाशास्त्री, मोठ्या कौतुकानं श्रीमंतांनीं चालवायला घेतलेल्या या रूळगाडीची ही दुर्दशा पाहून माझं डोकं ठणकायला लागलं आहे—

**अप्पाशास्त्री :** त्याच्यावर मीं उपाययोजना करण्याची तरतूद केली आहे. ही पाहा—

[ खाद्यालयाचा मक्तेदार रामय्या फडकें झटकीत येतो. ]

**रामय्या :** केशरमिश्रित दूध, खव्याची बर्फी, साबुदाण्याचा थालीपिट्ट आणिक आपण काय बोललेस महाराज ?

**अप्पाशास्त्री :** तूं अजून यादीच पाठ करीत बसला आहेस ! मद्रासकडे जाणाऱ्या मालगाडींत कोंबून तुला परत जन्मभूमीला पाठवलं पाहिजे.

रामय्या : जन्मभूमि पोळे ! मराठींत राहोनच जीव देणार !

हंबीरराव : अय्या, जीवहि देऊं नका आणि ते पदार्थहि एवढ्यांत पाठवूं नका–जा !

रामय्या : ठीक, जशी हुकूम. [ जातो. ]

हंबीरराव : अप्पाशास्त्री—

अप्पाशास्त्री : मीं म्हटलं, तुमचं डोकं दुखतं आहे. तेव्हां एक पेलाभर केशरी दूध जर—

हंबीरराव : बादलीभर केशरी दूध माझ्या डोक्यावर ओतलं तरी त्याचं दुखणं थांबायचं नाहीं ! त्या गाड्यांची अगोदर वाट लावली पाहिजे. तो माणकोजी कावळा कुठें आहे ? बाळाजी गेले ते गेले आणि स्वतःच्या कचेरीला कुलूप ठोकलं वर. त्याच्या किल्ल्या त्या माणकोजीजवळ.

अप्पाशास्त्री : माणकोजी बाहेर जायचा नाहीं. इथेंच कुठें तरी घोरत पडला असेल ! हा कोण इथें अंगाचं गांठोडं करून पडला आहे ?

[ तोंडावर शाल घेऊन फलाटावर बाजूला पडलेल्या माणसाला गदगदा हालवतो. शेवटीं तोंडावरील शाल बाजूला करतो. ]

अप्पाशास्त्री : फसलकरसाहेब, हें पाहा हरवलेलं माणिक इथं सांपडलं. जीवनांतलं सर्व कार्य संपल्याप्रमाणें निश्चिंत झोपला आहे बेटा. अहो माणकोजी, अहो माणकोजी, अहो माणकोजी कावळे—

माणकोजी : ( उठून डोळे चोळीत ) काय गडबड आहे ?

हंबीरराव : आधीं दोन पायांवर उठून उभे रहा.

माणकोजी : ठीक–ठीक—

[ झोकांड्या देत उठून उभा राहतो. ]

हंबीरराव : सरकारांतून तनखा घेतां तो काय फलाटावर झोपा काढण्यासाठीं ?

माणकोजी : ( शांतपणें ) गाडी आली वाटतं ?

हंबीरराव : कचेरीच्या किल्ल्या कमरेला लावून झोपलांत तुम्ही. गाडी येईल कशी ?

माणकोजी : पण मीं बबनरावाला सांगून ठेवलं होतं. काय हो बबनराव ?

[ रुद्रटराव व बबनराव येतात. बबनरावांनीं आपला फेटा बगलेंत घेतला असून त्याच्या डोक्यावरील केस पिंजारलेले व भिजलेले आहेत. ]

**बबनराव :** कसूर माफ करावी साहेब. आज त्या शिदण्णानं फाजीलपणा करून दोन गोळ्या जास्त घातल्या. नाहीं तर एरव्हीं इतकी चढत नाहीं.

**हंबीरराव :** ठीक ! सारे खातेप्रमुख आत्तां इथं जमलां आहांत आपण. कल्याण गार्डीतळावर सध्यां जी आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली आहे, तिचा विचार तर आपण केला पाहिजेच; परंतु रूळगाडी, तिचं स्वरूप, तिचं कार्य, त्यासंबंधींचीं बंधनं, नियम वगैरे गोष्टींबाबतहि तुमच्याशीं मोकळ्या मनानं आणि स्पष्टपणानं बोलणं आवश्यक आहे—बसा, सर्वजण खालीं बसा—

[ सर्व पडत्या फळाची आज्ञा घेऊन खालीं बसतात. हंबीरराव शिपाई जवळ जातो आणि वक्त्याप्रमाणें घसा खाकरून बोलतो.

**हंबीरराव :** मित्रहो, पुण्याच्या श्रीमंत सरकारांनीं ही रूळगाडी—

**रुद्रटराव :** ( घाबरेपणानें ) फसलकरसाहेब, प्रमुख आलेले दिसतात.

**हंबीरराव :** आले ? ठीक झालं. आतां तेच सारी निरवानिरव करतील.

[ बाजूला होतो. ]

**हुजऱ्या :** ( प्रवेश करून पुकारतो ) कल्याणके स्टेशनमास्तर साहेब श्रीमान् रूळबहाद्दुर राजमान्य राजेश्री बाळाजी आवजी की स्वारी आ रही है !

[ सर्वजण उठून उभे राहतात. बाळाजी डुलत डुलत प्रवेश करतात. पोशाख—पेशवाईतील खानदानी श्रीमंताला साजेलसा. हातांत सलकडीं, कानांत भिकबाळी, ओठावर भरघोंस मिशा. ]

**बाळाजी :** ( इतस्ततः पाहात ) बसा मंडळी ! कांहीं भानगड झाली आहे ?

**हंबीरराव :** भानगड फार मोठी झाली आहे साहेब.

**बाळाजी :** गाड्यांबद्दलच ना ? तें सारं कांहीं आम्हांला ठाऊक आहे. जरा घोटाळा उडाला आहे खरा. पण चिंता करायचं कारण नाहीं; जिथं अक्कल आहे तिथं शक्कल आहे. इथंच विचार करूं आपण ? आमचे जामात आले आहेत आज घरीं. म्हणून लगेच जायला हवं ! माणकोजी, तो रूळगाडीचा

नकाशा आणा बरं. [ माणकोजी जातो. ] रुद्रटराव, ती तिपाई करा इकडे. ती दुसरीहि आणा. ठेवा समोर. ( एका तिपाईवर बसून दुसरी टेबला-सारखी समोर घेतो. ) फसलकर, तुम्हांला वाटलं असेल, कीं आम्ही घरीं आहोंत म्हणून आमचं इकडे लक्ष नाहीं ! पण आम्हांला घरीं बसूनहि बारकाईनं दूरवर पाहण्याची कला अवगत आहे. नाना फडणविसाचे शिष्य आहोंत आम्ही ! ( मोठ्यानें हंसतो ) काय, खरं कीं नाहीं ?

**हंबीररावाशिवाय इतर सर्व** : हो, हो, वा ! वा ! अगदीं खरं ! सत्य, त्रिवार सत्य !

[ माणकोजी नकाशा घेऊन येतो ]

**बाळाजी आवजी** : आणा इकडे. ( समोरच्या तिपाईवर नकाशा पसरून ठेवतो. ) हं, आतां काय भानगडी झाल्या आहेत तें पाहूं. फसलकर, असे इकडे या. ( नकाशावर बोटानें दाखवीत ) हें आपलं कल्याण स्टेशन. आतां मौज काय झाली आहे, कीं या इथं अंबरनाथ तळावरती ऊर्ध्वगामी मद्रदेशी गाडी पहांटपासून येऊन बसली आहे. इकडे पश्चिम दिशेला डोंबिवली नगरानजीक अधोगामी मद्र अडकून पडली आहे. या दोन्ही गाड्या मद्रमार्गींच असल्यानं एकाच रुळावरून जाणार. तें प्रायः अशक्य आहे. काय अप्पाशास्त्री ?

**अप्पाशास्त्री** : अशक्य !

**बाळाजी आवजी** : तेव्हां आतां या दोन्हींतील एक गाडी परत माघारीं जायला हवी. मुंबापुरीहून आलेली मुंबापुरीस जायला हवी किंवा मद्रासहून आलेली परत मद्रासला तरी पाठवायला हवी.

**बबनराव** : बरोबर !

**हंबीरराव** : ( डोळे वटारून बबनरावाकडे पाहतो. ) हुजूर, येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांसाठीं वेगळे रूळ घातलेले आहेत. तेव्हां परत जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाहीं.

**बाळाजी आवजी** : ( ताठ होऊन ) शाबास ! ही गोष्ट अद्यापपर्यंत आम्हांला कोणींच कळवली नाहीं ! ठीक– आतां उत्तरेच्या मार्गावरतीं काय झालं तें पाहूं. हें टिटवाला नगर. इथं खरी गंमत उडाली आहे !

उत्तरेकडून आलेल्या दोन गाड्या, वंग आणि पंजाब, इथं पहाटेपासून उभ्या आहेत.—पण मग त्या एकामागं एक कां येत नाहींत ?

**हंबीरराव :** येणार कशा ? आपल्या सांधेवाल्यांनीं पहांटे गफलत केल्यामुळें पुण्याकडे जाणारी गाडी टिटवाल्याला त्यांच्या रुळावर जाऊन थडकली आहे.

**बाळाजी आवजी :** छान ! बबनरावाचं खातं ना हें ?

**बबनराव :** पहाटे मी कामावर नसतों सरकार.

**बाळाजी आवजी :** तुम्ही केव्हांच कामावर नसतां ! मग पहांटे होतं कोण सांधेखात्यांत ?

**हंबीरराव :** विसाजीराव अवचट.

**बाळाजी आवजी :** ठीक, आपल्या कर्तव्याला नाहीं, तरी आपल्या नांवाला जागला बिचारा ! बरं—ती पुण्याची गाडी माघारीं कां येत नाहीं ?

**हंबीरराव :** तिचं इंजिन नादुरुस्त झालं आहे.

**बाळाजी आवजी :** स्तुत्य ! आणखीन् काय घोटाळा झाला आहे ?

**हंबीरराव :** ठाकुरलीला दिल्ली गाडी येऊन पडली असून ठाण्याजवळ नाशिकला जाणारी सिंहस्थ-जादा उभी आहे. शिवाय या टापूंत दोन स्थानिक गाड्या अर्धेमर्धे अडकलेल्या आहेत !

**बाळाजी आवजी :** फारच गोंधळ उडाला एकूण ! इतका गुंतावळा सोडवायला तूर्त मला वेळ नाहीं. घरीं जामात आले आहेत. जामात म्हणजे दशम ग्रह. कोपला तर—

**हंबीरराव :** पण—पण—

**बाळाजी आवजी :** दुसराहि प्रश्न आहे. या गाड्या आतां कोणत्या क्रमानं काढायच्या ? हा प्रश्न आतां राजकीय स्वरूपाचा झालेला आहे. पुण्याची गाडी प्रथमतः पुण्याला जायला हवी. श्रीमंत सरकारांची राजधानी आहे ती. बरं, वंग—पंजाब—दिल्ली—मद्रास यांत निवड कशी करायची ? मद्रासला आपले दोस्त टोपीवाले आहेत, तर दिल्लीकडे आपले स्वकीय शिंदे—होळकर आहेत. वंगच्या सुभेदारांशीं आपल्या दरबारचा तंटा चालला आहे. तेव्हां ती गाडी अगोदर काढणं सर्वस्वीं अशक्य. काय ?

**बबनराव**
**रुद्रटराव**
**अप्पाशास्त्री**
**माणकोजी** : बरोबर ! अगदीं योग्य !
सर्वतोपरी अशक्य आणि अनुचितहि !

**बाळाजी आवजी** : तेव्हां आम्ही आतां घरीं जातों. तिथून आम्ही मोटरमार्गें पुणें शहरीं दूत रवाना करतों व कारभाऱ्यांचा सल्ला घेतों. कारभाऱ्यांच्या सल्ल्याशिवाय आतां यांतून निभाव नाहीं. आणि तेंच युक्त आहे

**हंबीरराव** : पण–पण–इथंहि शेकडों पांथस्थ अडकून पडले आहेत.

**बाळाजी आवजी** : तेवढाच मुख्य वांधा आहे. पण आपण त्यांची चांगली व्यवस्था करूं. अरे, त्या रामय्याला बोलाव. [ हुजऱ्या जातो. ] रुद्रटराव, आजचा गल्ला किती आहे ?

**रुद्रटराव** : आठशें रुपये, सात आणे, तीन पै.

**बाळाजी आवजी** : ठीक, पुष्कळ आहे, तेवढ्यांत सहज भागेल. ( रामय्या येतो ) रामय्या—

**रामय्या** : जी सरकार.

**बाळाजी आवजी** : फलाटावर किती लोक आहेत त्याचा अदमास घ्या आणि रात्रीं चंद्रोदयाच्या आंत सर्वांच्या भोजनाची व्यवस्था करा. द्रव्य रुद्रटरावांकडून घ्या. स्टेशनावरील सर्व अधिकारी नोकर व त्यांची कौटुंबिक मंडळीहि जमेला धरा. आम्हीहि जामातांना घेऊन येतों. बेत अगदीं फक्कड व्हायला हवा. काय विशेष करतां ?

**रामय्या** : बुंदी, मोतीचूर, श्रीखंड, जिलबी–कोणताहि आज्ञा करावे.

**बाळाजी आवजी** : ठीक, मग श्रीखंडपुरी होऊं द्या. काय मंडळी, बरोबर आहे ना ?

**हंबीररावाशिवाय सर्व** : वा ! छान ! उत्तम ! [ रामय्या जातो. ]

**बाळाजी आवजी** : बबनराव, रुद्रटराव, फलाट सगळा स्वच्छ करा आणि फलाटावरच पंगत होऊं द्या. ठीक, सारी व्यवस्था झाली. आम्ही जातों आतां. [ उठून उभा राहतो. ]

**हंबीरराव :** एक काम राहिलं आहे, साहेब. तेवढं करून टाकावं अशी विनंति आहे.

**बाळाजी आवजी :** कोणतं ?

**हंबीरराव :** मी राजीनामा देत आहें, तेवढा मंजूर करून जावं ही विनंति.

**बाळाजी आवजी :** ठीक, ठीक! तुमचा राजीनामा मंजूर करतों मी. बाकी किचकटच काम हें. मीसुद्धां त्याच विचारांत आहें.—पण सायंकाळच्या पंगतीला मात्र अवश्य यायचं हं. रुद्रटराव, घंटा वाजवून फलाटावरील सर्व लोकांना उठवा आणि फलाट स्वच्छ करायला लागा. आम्ही जातों आतां—

[ हुजऱ्या पुढें होतो व बाळाजी आवजी त्याच्यामागें जातात. आणि ते जातांच इतर लोकहि वेगवेगळ्या बाजूंनीं प्रयाण करतात. रुद्रटराव घंटा घेऊन येतो. ]

**हंबीरराव :** रुद्रटराव, मला एकदां अखेरची घंटा वाजवायची संधि द्या.

**रुद्रटराव :** आनंदानं.

[ घंटा हंबीररावाजवळ देऊन जातो. हंबीरराव फलाटावर मध्यभागीं उभा राहून जोरजोरानं घंटा वाजवितो. दृश्य दुसरें समाप्त. ]

## दृश्य ३

[ पहिल्या दृश्यांतील प्रतीक्षालय. बाहेर घंटेचा आवाज होतो. तोंडावर वृत्तपत्राचें आच्छादन घेऊन झोंपलेला पांथस्थ खडबडून जागा होतो, सभोंवार एकदा गोंधळलेल्या नजरेनें पाहतो आणि नंतर बॅग उचलून बाहेर जातो. ]

— समाप्त —

२००२२
ग्रं. वा.
२९९३
IRBK-0107081